दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
८ बुधवार एप्रिल २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक ३१२
✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

## वर्कशॉपमध्ये आगीचे तांडव



▸विदर्भ केसरी।

मध्य रेल्वेच्या माटुंगा येथील डबा दुरुस्ती कारखान्यात (Workshop) मंगळवारी दुपारी सव्वातीनच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. दुरुस्तीसाठी उभा असलेल्या एका एलएचबी (LHB) स्लीपर कोचला ही आग लागली असून, यामध्ये डब्याचे सुमारे ७० टक्के नुकसान झाले आहे. सुदैवाने, अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

प्राथमिक माहितीनुसार, दुपारी ३:१० वाजेच्या सुमारास वर्कशॉपमधील एका स्लीपर कोचमध्ये डागडुजीचे काम सुरू होते. या कोचच्या सीएसएमटीच्या दिशेकडील टोकाला असलेल्या स्वच्छतागृहाजवळ (टॉयलेट) वेल्डिंगचे काम सुरू असताना अचानक एक ठिणगी उडाली आणि आगीचा भडका उडाला. त्याच वेळी सुटलेल्या वेगवान वाऱ्यामुळे ही आग संपूर्ण डब्यात वेगाने पसरली. आगीच्या ज्वाळा आणि काळ्या धुराचे लोट माटुंगा स्थानकावरून दिसत असल्याने प्रवाशांमध्ये काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. या आगीची तीव्रता इतकी मोठी होती की, रेल्वेच्या अत्याधुनिक एलएचबी कोचचे ७० टक्क्यांहून अधिक नुकसान झाले आहे. आगीमुळे कोचची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली असून तो जवळपास निकामी झाला आहे. घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दलाच्या गाड्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि आगीवर नियंत्रण मिळवले. खबरदारीचा उपाय म्हणून आजूबाजूचा परिसर रिकामा करण्यात आला होता आणि वैद्यकीय पथकही तैनात करण्यात आले होते. ही दुर्घटना वर्कशॉपच्या अंतर्गत भागात घडल्यामुळे मुख्य रेल्वे मार्गावरील लोकल किंवा लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या वाहतुकीवर कोणताही परिणाम झाला नाही. मध्य रेल्वेची वाहतूक आपल्या निर्धारित वेळेनुसार सुरू होती, ज्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला. काही दिवसांपूर्वीच कुर्ला यार्डात लागलेल्या आगीची घटना ताजी असतानाच, आता माटुंगा वर्कशॉपमध्ये ही दुर्घटना घडल्याने रेल्वेच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. दुरुस्तीचे काम सुरू असताना आवश्यक ती खबरदारी घेतली गेली होती का, असा सवाल आता विचारला जात आहे. रेल्वे प्रशासनाकडून या आगीच्या कारणांची सखोल चौकशी केली जाणार आहे.

## IPL- राजस्थान रॉयल्सचा सलग तिसरा विजय

▸विदर्भ केसरी।



आयपीएल-२०२६ च्या १३ व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने (आरआर) मुंबई इंडियन्सचा (एमआय) २७ धावांनी पराभव केला. मंगळवारच्या या विजयामुळे रॉयल्स संघ १९ व्या हंगामाच्या गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचला आहे. संघाने आपला सलग तिसरा सामना जिंकला आहे, तर मुंबईने आपला सलग दुसरा सामना गमावला आहे. गुवाहाटीमध्ये सामन्यापूर्वी पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे सामना दोन तास उशिरा सुरू झाला. सामना ११ षटकांचा झाला. नाणेफेक गमावून फलंदाजी करताना राजस्थानने ११ षटकांत ३ गडी गमावून १५० धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल मुंबईला ११ षटकांत ९ गडी गमावून केवळ १२३ धावा करता आल्या. यशस्वी जैस्वालने ३२ चेंडूंत १० चौकार आणि चार षटकारांसह ७७ धावा करून राजस्थानच्या डावाचे नेतृत्व केले. वैभव सूर्यवंशीने १४ चेंडूंत ३९ धावा केल्या. या दोघांनी सलामीला ८० धावांची भागीदारी केली. आयपीएल-२०२६ च्या १३ व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने (आरआर) मुंबई इंडियन्सचा (एमआय) २७ धावांनी पराभव केला. नाणेफेक गमावून फलंदाजी करताना राजस्थानने ११ षटकांत ३ गडी गमावून १५० धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल मुंबईला ११ षटकांत ९ गडी गमावून केवळ १२३ धावा करता आल्या.

# टँकरमधून गॅस गळती

## जालना एक्झिटच्या पुढे वाहनांची 25 KM लांब रांग; हजारो वाहने अडकली

▸विदर्भ केसरी।



गतिमान प्रवासासाठी हाती घेण्यात आलेला समृद्धी महामार्ग आता प्रवाशांसाठी चांगलाच अडचणीचा ठरू लागला आहे. मंगळवारी तारीख 7 तब्बल 25 किलोमीटरचा जाम लागल्यामुळे हजारो वाहने अडकून पडली आहेत. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत असताना महामार्ग पोलिसांकडून मात्र हाताची घडी आणि तोंडावर बोट ठेवले जात आहे.

नागपूर ते मुंबई असा समृद्धी महामार्ग मागील दीड ते दोन वर्षात खुला करण्यात आला आहे. या मार्गावरून वाहनांचा गतिमान प्रवास होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र या मार्गावरून वाहतूक गतिमान होणे ऐवजी वारंवार वाहतूक ठप्प होण्याची प्रकार होऊ लागले आहेत. या समृद्धी महामार्गावर अपघात नित्याचे झाले असून अनेकांना जीव गमवावे लागले आहे. दोन दिवसांपूर्वीच या महामार्गावर सात मजुरांचा बळी गेला. त्यानंतरही या महामार्गाच्या वाहतुकीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे.

मंगळवारी (ता. ७) या महामार्गावर जालना एक्झिट च्या पुढे काही अंतरावर टँकर मधून गॅस लिकेज होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे या महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. दुपारपासून सुमारे 25 किलोमीटर अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. हजारो वाहने अडकून पडली आहेत. विशेष म्हणजे काही वाहने जालना एक्झिट जवळ असताना कार सारख्या छोट्या वाहनांना जालना एक्झिट वरून खाली उतरण्यासाठी रस्ता मोकळा करावा अशी मागणी प्रवाशांनी महामार्ग पोलिसांकडे केली. मात्र पोलिसांकडून कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नसल्याने प्रवाशांमधून संतापाची भावना व्यक्त होऊ लागली आहे.

### गैरसोयीमुळे प्रवाशांनी व्यक्त केला संताप

■ या संदर्भात काही प्रवाशांनी समृद्धी महामार्गाच्या नियंत्रण पथकाशी संपर्क साधला असता त्यांनी मात्र महामार्ग सुरू असल्याचे सांगत अज्ञान प्रगट केले. मात्र प्रत्यक्षात 25 ते 30 किलोमीटर अंतरापर्यंतच्या वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. महामार्गाच्या नियंत्रण विभागाच्या या अज्ञानावरही प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे. या महामार्गावरून पोलिसांसोबतच उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची वाहने धावत असल्यामुळे आता महामार्ग खुला होईल अशी अपेक्षा व्यक्त होऊ लागली. मात्र उपप्रादेशिक परिवहन विभाग देखील या जाम पासून अनभिज्ञ असल्याचे दिसून आले.



# आज रात्री इराणची संपूर्ण संस्कृती संपुष्टात येईल

## होर्मुझ उघडण्याच्या मागणीला चीन-रशियाने व्हेटो वापरला:संयुक्त राष्ट्रात ठराव फेटाळला; ट्रम्प यांची धमकी

▸विदर्भ केसरी।

इराणच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याची मागणी करणारा ठराव संयुक्त राष्ट्रांमध्ये (UN) मंजूर होऊ शकला नाही. रशिया आणि चीनने त्याला नकाराधिकार (व्हिटो) दिला. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, या ठरावात कोणत्याही लष्करी कारवाईची मागणी करण्यात आली नव्हती.

हा ठराव बहरीनने मांडला होता. अल जझीराच्या वृत्तानुसार, गेल्या दोन आठवड्यांत या ठरावात सहा वेळा दुरुस्ती करण्यात आली, कारण अनेक देशांनी त्यातील काही भागांशी असहमती दर्शवली होती.

दुसरीकडे, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की, इराणची संपूर्ण संस्कृती आज रात्री संपुष्टात येऊ शकते. ट्रम्प यांनी दावा केला की, "आज रात्री आपण जगाच्या दीर्घ आणि गुंतागुंतीच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या क्षणाचे साक्षीदार होऊ." दक्षिण आफ्रिकेतील इराणी दूतावासाने ट्रम्प यांच्या धमकीला प्रत्युत्तर दिले आहे. इराणने म्हटले आहे की, अमेरिका आणि त्यांच्या मित्र राष्ट्रांना इराणच्या प्राचीन संस्कृतीकडून असे प्रत्युत्तर मिळेल जे ते कधीही विसरणार नाहीत. अमेरिका आणि इस्रायलने मंगळवारी इराणमधील अनेक ठिकाणी हल्ले केले. सर्वात मोठा हल्ला खार्ग बेटावर झाला, जिथे एका तेल टर्मिनलला लक्ष्य करण्यात आले. इराण आपल्या कच्च्या तेलापैकी अंदाजे ८० ते ९०% तेल निर्यात करतो. कोम आणि काशानमधील पुलांनाही लक्ष्य करण्यात आले. काशानजवळील येह्याबाद रेल्वे पुलावरील हल्ल्यात दोन जण ठार आणि तीन जण जखमी झाले. वायव्य इराणमधील तब्रीझ-झंजन महामार्गावरील एका पुलावरही हल्ला झाला. यापूर्वी, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इशारा दिला होता की, जर इराणने मंगळवारी रात्री ८ वाजेपर्यंत (अमेरिकेच्या वेळेनुसार) होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली नाही, तर त्यांच्या महत्त्वाच्या आस्थापनांवर हल्ला केला जाईल.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे

!! पाहिजेत !!

**कार्यालय व्यवस्थापक** (Office Manager)
'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.

⏭ पात्रता आणि आवश्यकता:

पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.
**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.

- **शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर**
- **आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.**
- **एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.**

इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:
कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.
संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९

## 'तो' कारखाना पोलिसांनी केला सील

▸विदर्भ केसरी।

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील अंजनगाव येथील वादग्रस्त पुतळा प्रकरणात पोलिसांनी तपासाचा फास अधिक आवळला आहे. पुतळा पुरवणारा मुख्य सूत्रधार बाळराजे ऊर्फ बाळू आवारे याच्या जालन्यातील कारखान्यावर प्रशासनाने टाळे ठोकले असून, त्याच्या एका जवळच्या साथीदारालाही सोलापूर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे अनधिकृत पुतळे तयार करणाऱ्या आणि बसवणाऱ्या टोळीचे धाबे दणाणले आहेत.

माढा तालुक्यातील अंजनगाव खेलोबा येथे धनगर समाजाच्या देवस्थान परिसरात बाळू आवारेने कोणत्याही कायदेशीर परवानगीशिवाय रात्रीतून पुतळा बसवला होता. या घटनेमुळे दोन समाजांमध्ये तणाव निर्माण होऊन त्याचे रूपांतर दगडफेक आणि दंगलीत झाले होते. या प्रकरणात दोन्ही गटांतील अनेकांवर आणि मुख्य सूत्रधारावर आतापर्यंत आठ गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील चुर्मापुरी येथे बाळू आवारेचा हा कारखाना सुरू होता. धक्कादायक बाब म्हणजे, शासकीय गायरान जमिनीवर 'कृषी अवजारे सेवा केंद्र' असल्याचे भासवून एका पत्र्याच्या शेडमध्ये अनधिकृतपणे पुतळ्यांची निर्मिती केली जात होती. अंबडच्या उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार, पोलिसांनी या कारखान्यावर धाड टाकून तो सील केला आहे.

### ■ सहकाऱ्याला सीमेवरून अटक

बाळू आवारेला तीन दिवसांपूर्वीच पोलिसांनी बेड्या ठोकल्या होत्या. त्यानंतर आता त्याचा सहकारी संभाजी आघाव याला सोलापूर-धाराशिव सीमेवरून पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता सोलापूर ग्रामीण पोलीस दलाने आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी विशेष पथके तैनात केली आहेत.

### ■ गंभीर गुन्ह्यांची नोंद

बाळू आवारेवर केवळ माढाच नव्हे, तर करमाळा तालुक्यातील पुनावर येथेही अशाच प्रकारे विनापरवाना पुतळा बसवल्याचा आरोप आहे. त्याच्यावर जातीय तेढ निर्माण करणे, चिथावणीखोर भाषणे देणे, पोलिसांवर हल्ला करणे आणि सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे यांसारखे गंभीर गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.



## अग्रलेख

# एक देश, एक निवडणूक

'एक देश, एक निवडणूक' हा भाजपचा पुढचा अजेंडा राहणार आहे. देशात सध्या समान नागरी कायदा (यूसीसी) आणि 'एक देश, एक निवडणूक' यावर सकारात्मक चर्चा सुरू असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त कार्यकर्त्यांना आभासी पद्धतीने संबोधित करताना स्पष्ट केले. यूसीसी आणि 'एक देश, एक निवडणूक' हे विषय भाजपच्या अजेंड्यावरील महत्त्वाचे 'अधुरे कार्य' असल्याचे मोदी म्हणाले. भाजपच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधानांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. (हा त्यांचा जन्मसिद्ध हक्क दिसतो!) पंतप्रधान म्हणाले, भाजप कार्यकर्त्यांनी आणीबाणीसारख्या काळाचा सामना केला असून काँग्रेसच्या राजवटीत अनेक संकटे झेलली आहेत. पश्चिम बंगाल आणि केरळसारख्या राज्यांचा उल्लेख करत मोदी म्हणाले, या राज्यांमध्ये हिंसाचाराला राजकीय संस्कृतीचे स्वरूप दिले गेले आहे. तेथे अनेक भाजप कार्यकर्त्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले आहे. भाजप हा एकमेव असा पक्ष आहे जिथे कार्यकर्ता पक्षाला आपली माता मानतो. म्हणूनच पक्षाचा स्थापना दिन हा केवळ राजकीय कार्यक्रम नसून प्रत्येक कार्यकर्त्यासाठी तो एक भावनिक क्षण आहे. देशासमोर असलेल्या प्रत्येक आव्हानाचा भाजप खंबीरपणे सामना करत असून, भविष्यातही याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. 'एक देश, एक निवडणूक'(लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेणे) आणि 'समान नागरी कायदा'(विवाह, दत्तक विधान इत्यादीसाठी सर्वांना समान कायदा) यावर देश सकारात्मक दिशेने पुढे जात आहे. ब्रिटिश काळातील कालबा कायदे रद्द करणे, नवीन संसद भवनाची उभारणी, सवर्णामधील गरिबांना १० टक्के आरक्षण, तिहेरी तलाक बंदी, सीएए आणि अयोध्या राम मंदिर निर्मिती ही भाजपच्या प्रामाणिक प्रयत्नांची फळे असल्याचे त्यांनी सांगितले. ६ एप्रिल हा भाजपचा ४६ वा वर्धापनदिन होता. यावेळी नरेंद्र मोदी म्हणाले, देशाला माहीत आहे की, प्रत्येक आव्हानाचा सामना करण्यासाठी भाजप मनापासून प्रयत्न करत आहे आणि भविष्यातही आम्ही असेच प्रयत्न करणार आहोत. भूतकाळात आम्हाला सकारात्मक परिणाम मिळाले आहेत आणि भविष्यातही आम्हाला असेच यश मिळत राहील. कायद्याद्वारे 'ट्रिपल तलाक'वर बंदी घालणे, नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) लागू करणे आणि अयोध्येत राम मंदिराची उभारणी करणे ही भाजपच्या प्रामाणिक प्रयत्नांची काही उदाहरणे आहेत. मात्र पक्षाचे हे कार्य अजूनही सुरूच आहे. कारण समान नागरी संहिता (यूसीसी) आणि 'एक देश, एक निवडणूक' यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सध्या देशभरात गांभीर्याने चर्चा सुरू आहे. आरएसएसच्या विशाल आणि पवित्र वटवृक्षाच्या छायेखाली आम्हाला शुद्ध हेतूने व सचोटीने राजकारणात प्रवेश करण्याची प्रेरणा मिळाली असे सांगताना मोदी म्हणाले, सुरुवातीच्या काही दशकांमध्ये आम्ही आमची ऊर्जा संघटनेसाठी धोरणे आखण्यात समर्पित केली. त्यानंतर असा काळ आला जेव्हा भाजपने स्वत:ला एक मजबूत आणि कार्यकर्त्यांवर आधारित पक्ष म्हणून उभारण्यात स्वत:ला पूर्णपणे झोकून दिले. आम्ही कार्यकर्त्यांची एक विशाल फळी उभी केली, जी सेवेच्या भावनेने काम करण्यास समर्पित होती. अशी माणसे ज्यांनी पक्षाच्या तत्त्वांनाच आपल्या जीवनाचे आदर्श मानले आणि ज्यांनी कोणत्याही परिस्थितीत आपल्या मूल्यांशी कधीही तडजोड केली नाही. असो. भाजपचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत यात शंका नाही. भाजपच्या रणनीतीचे ताजे उदाहरण म्हणजे, पश्चिम बंगालमध्ये फायद्यासाठी भाजपकडून महिला आरक्षणाची खेळी करण्यात आली आहे. पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या केवळ आठवडाभर आधी संसदेच्या तीन दिवसांच्या अधिवेशनामध्ये महिला आरक्षण कायद्यात दुरुस्ती करण्याचा घाट घालून केंद्र सरकारने महिला मतदारांना भाजपकडे आकर्षित करण्याची खेळी केली आहे. आचारसंहिता लागू असताना घाईघाईने घटनादुरुस्तीला काँग्रेस व तृणमूल काँग्रेस या दोन्ही पक्षांनी विरोध केल्याने राजकीय संघर्ष तीव्र झाला आहे. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित न होता तहकूब करण्यात आले असून १६ ते १८ एप्रिल दरम्यान 'नारी शक्ती वंदन अधिनियम' या कायद्यामध्ये घटनादुरुस्ती केली जाणार आहे. या घटनादुरुस्तीद्वारे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीमध्येच महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित ठेवल्या जातील. त्यासाठी मतदारसंघाची फेररचना करावी लागणार आहे. पण, २०२७ च्या जनगणनेची वाट न पाहताच २०११ च्या जनगणनेनुसार ही फेररचना लागू केली जाईल. घटनादुरुस्तीसारखा अत्यंत महत्त्वाचा निर्णय एकतर्फी, विरोधकांशी चर्चा न करताच घेण्यास काँग्रेस व तृणमूल काँग्रेसने आक्षेप घेतला आहे. तसे पत्र काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधानांना लिहिले होते. शिवाय, सर्वपक्षीय बैठक घेऊन निर्णय घेण्याचेही आवाहन केले होते. मात्र, या पत्राला तसेच सर्वपक्षीय बैठकीच्या मागणीला केंद्र सरकारने प्रतिसाद दिला नाही. 'नारी शक्ती वंदन अधिनियम' कायद्यातील दुरुस्तीच्या वेळेवर तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी शंका उपस्थित केली आहे. पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेस व भाजप यांच्यातील लढाई तीव्र झाली असून दोन्ही पक्षांसाठी महिला मतदार निर्णायक असल्याने त्यांना आकर्षित करण्याचे प्रयत्न दोन्ही पक्षांकडून केले जात आहेत. भाजपने मध्य प्रदेश, महाराष्ट्र, बिहार या राज्यानंतर पश्चिम बंगाल निवडणुकीतही महिला मतदार केंद्रित प्रचाराच्या रणनीतीवर भर दिला आहे. याआधी झालेल्या राज्यांतील विधानसभा निवडणुकीत लाडली बहेना, लाडकी बहीण अशा नावाखाली महिलांच्या हाती रोख रक्कम देणा-या रेवड्यांचा लाभ निवडणुकांमध्ये भाजपला झाला होता. आता पश्चिम बंगालमध्ये महिला आरक्षणाच्या कायद्यात बदल करून निवडणूक काळात नवी रेवडी वाटण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा प्रमुख आधार असलेल्या महिला मतदारांवरील प्रभाव कमी करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असताना केंद्र सरकार महिला आरक्षण कायद्यात बदल करण्याचा महत्त्वाचा निर्णय कसा घेऊ शकते असा सवाल काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव जयराम रमेश यांनी उपस्थित केला आहे. २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक संमत झाले तेव्हाच खरगेंनी या कायद्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली होती. तामिळनाडू व पश्चिम बंगालमधील निवडणुकांवर प्रभाव टाकणे हाच भाजपचा एक कलमी कार्यक्रम आहे. काँग्रेसविरोधात कायम तुणतुणे वाजवणा-या भाजपची 'हम करे सो कायदा' हीच रणनीती आहे.

# २५० जणांना अन्नातून विषबाधा

**▸विदर्भ केसरी।उमरी :**

उमरी तालुक्यातील कावलगुडा (बु) येथे मंदिरात आयोजित सामूहिक भोजन कार्यक्रमानंतर मोठ्या प्रमाणावर अन्न विषबाधेची घटना घडली. या घटनेत सुमारे २५० ग्रामस्थांना उलट्या व जुलाबाचा त्रास सुरू झाल्याने त्यांना तातडीने उमरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मंगळवारी गावातील मंदिरात आंबील व वरण,भाताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या भोजनात सहभागी झालेल्या अनेकांना सायंकाळपासून अस्वस्थ वाटू लागले. सुरुवातीला काहींनी खासगी दवाखान्यातून औषधे घेतली, मात्र प्रकृती अधिकच बिघडू लागल्याने रात्रीच्या सुमारास मोठ्या प्रमाणात रुग्णांना येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. रुग्णालयात एकाच वेळी मोठ्या संख्येने रुग्ण दाखल झाल्याने आरोग्य यंत्रणेवर ताण निर्माण झाला. डॉक्टर, परिचारिका, १०८ आपत्कालीन सेवा पथक तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी यांना तातडीने पाचारण करून उपचार सुरू करण्यात आले. रुग्णांमध्ये महिला, पुरुष, वृद्ध तसेच लहान मुलांचाही समावेश आहे.

रुग्णसंख्या वाढल्यामुळे उपलब्ध बेड अपुरे पडले असून काही रुग्णांना रुग्णालयाच्या व्हरांड्यातच सलाईन लावून उपचार देण्यात येत आहेत. आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी ॲम्ब्युलन्सचीही व्यवस्था करण्यात आली. दरम्यान, स्थानिक लोकप्रतिनिधींनीही घटनास्थळी धाव घेत रुग्णांसाठी औषधे व सलाईनची व्यवस्था केली. मात्र, काही डॉक्टर अनुपस्थित असल्याची बाब समोर आल्याने रुग्णांच्या नातेवाईकांत नाराजी व्यक्त केली जात आहे. घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, अन्नातील कोणत्या घटकामुळे विषबाधा झाली याबाबत तपास सुरू आहे. आरोग्य विभागाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.



घटनेची माहिती मिळताच धर्माबादच्या उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे, तहसीलदार मंजुषा भगत, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अध्यक्ष क्रांती शिलेदार, अर्जुन शिंदे, डॉ चंदापुरे, पोलिस निरीक्षक जयप्रकाश गुठे, उमरी नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष कैलास देशमुख गोरठेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष देशमुख गोरठेकर, माजी नगराध्यक्ष संजीव कुलकर्णी, व्ही. पी के. समूहाचे सी ई.ओ संदीप कवळे पाटील, अमोल ढगे, छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष माधव ताटे यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी या प्रकरणी गांभीर्याने लक्ष देऊन रुग्णांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

दरम्यान या घटनेची माहिती प्राप्त होताच नांदेड जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संगीता देशमुख यांनीही उमरी येथील ग्रामीण रुग्णालयास तातडीने भेट देऊन या गंभीर परिस्थितीची पाहणी केली व रुग्णांना अत्यावश्यक सेवा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी मोलाची मदत केली असल्याचे दिसून आले. दरम्यान, या प्रकरणी वृत्त लिहीपर्यंत कुठलीही जीवितहानी झाल्याचे दिसून आले नाही.

# कार-दुचाकीच्या भीषण अपघातात बहिण, भाऊ जागीच ठार

**▸विदर्भ केसरी। परभणी :**





तालुक्यातील झरी पासून जवळच असलेल्या जिंतूर मार्गावरील कॅनलजवळ मंगळवार, दि.७ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास कार व दुचाकीचा भीषण अपघात झाला. या भीषण अपघातात दोन बहिण, भावांचा जागीच मृत्यू झाला. अपघातात मृत्यू पावले बहीण, भाऊ हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील वटकळ येथील रहिवासी असल्याचे समजते.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, झरीकडून जिंतूरकडे जाणारी मोटरसायकल एमएच ३८ टी २२३१ व जिंतूरकडून झरीकडे येणारी एचआर २६ डीएफ ७८९० नंबरच्या कार चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने या दोन वाहनांचा समोरासमोर भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील शितल माधव व्यवहारे, श्रीराम माधव व्यवहारे हे दोघे बहिण, भाऊ जागीच ठार झाले.

झरी प्राथमिक आरोग्य केंद्राची ॲम्बुलन्स घटनास्थळी तात्काळ दाखल होऊन चालक दिनेश बिरगड यांच्यासह शिवाजी देशमुख, इब्राहीम ईसाक इनामदार, गोपाळ देशमुख व ग्रामस्थांनी दोघांनाही परभणी शासकीय रुग्णालयात पाठविले. या अपघातामुळे वाहतूक विस्कळीत झाली होती. या घटनेची माहिती ग्रामीण पोलीस उपअधीक्षक दिपककुमार वाघमारे, ग्रामीण पोलीस ठाण्याचे सपोनि. जीवन राजगुरू, अभिजीत आडके, मोटार वाहन निरीक्षक हनुमंत सुळे, शहर वाहतूक शाखेचे सपोनी. बेले व कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान हा अपघात कार समोरील गाडीला ओव्हरटेक करत असताना समोरून येणारी दुचाकी न दिसल्यामुळे झाल्याचे समजते. या अपघातानंतर कारने अपघातस्थळापासून मोटार सायकल ३० ते ४० मीटर अंतरापर्यंत घासत नेली होती. हा अपघात कारचालकाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याची चर्चा नागरिकांमधून होताना दिसून येत होती. यावेळी शेकडो नागरिक अपघातस्थळी बघ्याची भूमिका घेत उभा होते परंतू अपघातग्रस्तांना मदत करण्यास पुढे येण्यास धजावत नव्हते. नागरिकांनी पोलिसांची भिती मनात न बाळगता अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे यावे, असे आवाहन जि. प. सदस्य दिलीपराव देशमुख यांनी केले आहे.

# देशभरात मुसळधार पावसाचा इशारा

**▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली/ पुणे :**



मार्चमधील गोंधळात टाकणा-या हवामानानंतर एप्रिलमध्येही देशातील अनेक भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावली. गेल्या महिन्यात प्रामुख्याने उत्तर भारतात हवामानाचे विचित्र स्वरूप पाहायला मिळाले. जिथे उंच डोंगराळ प्रदेशात बर्फवृष्टी आणि मैदानी भागात अवकाळी पावसासह गारपिटीने तडाखा दिला. यादरम्यान भारतीय हवामान खात्याने संपूर्ण देशभरात वादळी पावसाचा इशारा दिला आहे. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण होऊन उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळणार असला तरीही त्याचा मान्सूनशी थेट संबंध नसल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

एकामागून एक येणा-या तीव्र पश्चिमी विक्षोभांमुळे हवामानात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. स्थानिक पातळीवर तयार झालेले बाष्प आणि वातावरणातील इतर बदलांच्या परस्पर संबंधामुळे देशभरात अवकाळी पाऊस पडत असल्याचे हवामान तज्ज्ञांचे मत आहे. यादरम्यान देशाच्या विविध भागांत सुरू असलेल्या पावसामुळे यंदा मान्सूनचे आगमन लवकर होणार असल्याची चर्चा शेतक-यांमध्ये रंगली आहे. मात्र, सध्याचा पाऊस आणि १ जूनच्या सुमारास केरळमध्ये धडकणारा अधिकृत मान्सून यांमध्ये मोठा फरक आहे. सलग दोन पश्चिमी विक्षोभांमुळे हा पाऊस पडत असल्याचे हवामान तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. पश्चिमी विक्षोभ प्रणालीचा उगम अफगाणिस्तान आणि इराणच्या सीमेपलीकडून होतो. हे वारे भूमध्य समुद्र, काळा समुद्र, कॅस्पियन व अरबी समुद्रातून बाष्प शोषून घेतात आणि उंचीवरून भारतीय उपखंडात दाखल होतात.

पंजाब, हरियाणा, उत्तराखंड व हिमाचल प्रदेशात ताशी ६० ते ७० किमी वेगाने वाहणारे वारे आणि गारपिटीची शक्यता आहे. जम्मू-काश्मीर आणि हिमाचलच्या उंचावरील भागात सुरू आहेत. बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रातून येणा-या बाष्पयुक्त वा-यांमुळे महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांत अधूनमधून अवकाळी पावसाच्या सरी कोसळत आहेत, तमिळनाडू, केरळ व कर्नाटक या राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याने तेथे यलो अलर्ट देण्यात आला आहे.

### उत्तर भारतातील तापमानात मोठी घट

■ **ढगाळ वातावरणामुळे राजधानी दिल्लीतील तापमानात लक्षणीय घट झाली आहे. सततच्या ढगाळ हवामानामुळे ५ एप्रिल रोजी दिल्लीतील कमाल तापमानाचा पारा ३२ अंशाचा खाली आहे, गारव्याचा हा परिणाम इतर राज्यांमध्ये अधिक तीव्रतेने दिसून येत आहे. पंजाबमधील सरासरी कमाल तापमान सामान्यपेक्षा २.६ अंश सेल्सिअसने घसरले. हरियाणातील तापमान सरासरीपेक्षा १.८ अंश सेल्सिअसने कमी नोंदवण्यात आले. ग्वाल्हेर आणि रेवा या भागांत किमान तापमानात २.४ अंश सेल्सिअसपर्यंत मोठी घट झाली.**

### पावसामुळे शेतक-यांचे प्रचंड नुकसान

■ **हे हवामान कृषी क्षेत्रासाठी मात्र चिंतेचे कारण ठरले आहे. ऐन शेतीच्या हंगामात आलेल्या या अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. एप्रिल महिन्यातील अवकाळी पाऊस आणि गारपिटीने महाराष्ट्रासह राजस्थान, पंजाब व हरियाणातील शेतक-यांचे कंबरडे मोडले आहे. ऐन काढणीच्या हंगामात आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे गव्हाच्या पिकाचे प्रचंड नुकसान झाल्याने बळीराजावर आर्थिक संकट ओढवले आहे.**




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक
विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
बुधवार, ८ एप्रिल २०२६ | ३

GOOD MORNING
# कॉटनसिटी
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## विटा ठेवण्याच्या वादातून मारहाण

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

रोडवर विटा ठेवण्याचा कारणावरुन काही जणांमध्ये वाद झाला. ही घटना दारव्हा तालुक्यातील जवळा (ब्रह्मनाथ) येथे ४ एप्रिल रोजी घडली. यात किरण श्रीराम चव्हाण (४२) आणि आर्यमान किरण चव्हाण (२२) रा. जवळा या दोघांनी आपल्याला मारहाण केल्याची तक्रार मोहर हरी चव्हाण (३५) रा. जवळा यांनी दारव्हा पोलिसात दाखल केली आहे. त्यावरुन दारव्हा पोलिसांनी दोघांवर गुन्हे दाखल केले आहेत.

**महत्त्वाचे**



## पुसद येथे गॅस टंचाईविरोधात वंचित बहुजन आघाडीचे भव्य आंदोलन

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

राज्यभरात निर्माण झालेल्या गॅस टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवन विस्कळीत झाले असून, याविरोधात वंचित बहुजन आघाडी च्या वतीने आज दिनांक 6 एप्रिल 2026 रोजी पुसद येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर भव्य जनआंदोलन करण्यात आले. या आंदोलनात महिला, छोटे व्यावसायिक, ऑटो रिक्षाचालक, हॉटेल व केटरिंग व्यावसायिक यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. "नरेंद्र कब मिलेगा गॅस सिलेंडर" या घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनादरम्यान वक्त्यांनी सांगितले की, गॅस टंचाईमुळे दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम झाला असून अनेक छोटे व्यवसाय बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. काही ठिकाणी गॅस सिलेंडरसाठी लांबच लांब रांगा लागत असून, काळाबाजारही वाढला असल्याचे निदर्शनास आले आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले असून, प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी विविध मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

- **प्रमुख मागण्या:**

गॅस सिलेंडर टंचाई तात्काळ दूर करावी, गॅसचा नियमित व पारदर्शक पुरवठा सुरू करावा, काळाबाजार रोखण्यासाठी कठोर कारवाई करावी गॅस मिळत नसलेल्या नागरिकांना तातडीने सुविधा द्यावी, गरीब व गरजू नागरिकांसाठी विशेष उपाययोजना कराव्यात, यावेळी आंदोलनकर्त्यांनी इशारा दिला की, जर शासनाने या मागण्यांकडे तात्काळ लक्ष दिले नाही, तर येणाऱ्या काळात आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल.

## भाड्याचा बैल' म्हणताच वाद

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

तू मला भाड्याचा बैल का म्हटले, असा जाब विचारत दोन तरुणांमध्ये चांगलाच वाद पेटला. यात एका तरुणाला गंभीर मारहाण करण्यात आली. ही घटना राळेगावच्या शांतीनगरात ६ एप्रिल रोजी घडली. यात हरीश उर्फ सेंटी जगदीश चहार (२८) रा. दादा बादशाह वार्ड याने नंदू हिरालाल गुप्ता (४४) रा. शांतीनगर याला काळीने मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. गुप्ता यांच्या फिर्यादीवरुन राळेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## कंपनीचे ९५ हजारांचे साहित्य लंपास

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

वीज पुरवठ्याशी संबंधित कामाचे कंत्राट घेतलेल्या एका कंपनीचे तब्बल ९५ हजार रुपयांचे साहित्य अज्ञात चोरट्याने लंपास केले. ही चोरी १ ते ४ एप्रिलच्या दरम्यान उमरखेड तालुक्यातील बारा गाव परिसरात घडली. यात पॉली कंप इंडिया कंपनीचे ११ केव्ही विद्युत वाहिनी विलगीकरणाचे काम करण्यासाठी आणलेले ३ लोखंडी पोल, साडेचार किमी लांबीचा ॲल्युमिनयमचा तार चोरीस गेला आहे. या प्रकरणी मरसूळ येथील अजय निरंजन बनसोड (३२) यांनी उमरखेड पोलिसात तक्रार दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# धुर्वे यांनी प्रशासनाला धरले धारेवर

### रखडलेल्या कामांवरून ग्रामस्थ आक्रमक

**▸विदर्भ केसरी। राळेगाव**





राळेगाव: येथील पंचायत समितीच्या वतीने आयोजित वार्षिक आमसभा आणि पाणी टंचाई आढावा बैठकीत प्रशासकीय कारभाराचे वाभाडे निघाले. तालुक्यातील रखडलेली विकासकामे आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे संतापलेल्या नागरिकांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. यामध्ये आपटी येथील महिला प्रतिनिधी कविता धुर्वे यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा पंचनामा केला.

सभेत बोलताना कविता धुर्वे यांनी आपटी गावातील विदारक स्थिती सभागृहासमोर ठेवली. "आमच्या गावात पाईपलाईनचे काम गेल्या अनेक दिवसांपासून अर्धवट अवस्थेत आहे, रस्ते उखडलेले आहेत आणि दोन वर्षांपासून सतत पाठपुरावा करूनही सौर ऊर्जा संच (सोलर) बसवण्यात आलेले नाहीत," अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. विशेषतः स्मशानभूमीच्या दुरवस्थेचा मुद्दा त्यांनी लावून धरला. पावसाळ्यामुळे स्मशानभूमीचे मोठे नुकसान झाले असून तिथे अंत्यसंस्कार करणेही कठीण झाले आहे, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

- **"ग्रामसभा केवळ कागदावरच का?" – धुर्वे यांचा सवाल**

प्रशासकीय पारदर्शकतेवर बोट ठेवताना कविता धुर्वे यांनी विचारले की, गावागावात होणाऱ्या ग्रामसभा केवळ कागदी घोडे नाचवण्यासाठी आहेत का? "सभेला सरपंच किंवा महत्त्वाचे लोक उपस्थित नसतानाही ग्रामसेवक इतिवृत्त (प्रोसिडिंग) कसे काय लिहितात?" असा रोखठोक सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या या प्रश्नामुळे उपस्थित अधिकाऱ्यांची मोठी कोंडी झाली.

आगामी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीत घरकुल योजना व पाणी टंचाईचा प्रश्नही गंभीरपणे चर्चिला गेला. अनेक गावांमधील पाणी योजना तांत्रिक कारणांमुळे किंवा प्रशासकीय दिरंगाईमुळे रखडल्याने नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. घरकुल योजने विषयी वंचित लाभार्थ्यांना तात्काळ यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. या बैठकीला माननीय. आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्यासह तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कविता धुर्वे यांनी मांडलेल्या या समस्यांची दखल घेऊन प्रशासन आता ठोस पावले उचलणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.यावेळी डॉ अशोकराव उईके अध्यक्षस्थानी होते, प्रमुख अतिथी म्हणुन सुधीर पाटील उपविभागीय अधिकारी राळेगाव, प्रफुलसिंह चव्हाण, चित्तरंजनदादा कोल्हे, प्रविणभाऊ कोकाटे, संजय काकाडे, तहसीलदार, केशव पवार गटविकास अधिकारी, भारती ईसळ, सागर विठाळकर, शंकरराव हटकर वन विभाग, अभिषेक बोरगमवार,निचतसाहेब, गवई उप अधीक्षक भूमि अभिलेख, परेकर मुख्याधिकारी नगर पंचायत, चव्हाण पाणी पुरवठा, योगेश दंदे पोलीस अधिकारी उपस्थित होते.



## प्रा.अर्चना हरिमकर यांची ओबीसी महिला जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती

**▸विदर्भ केसरी। पुसद**

येथील सामाजिक कार्यकर्त्या प्रा. अर्चना दीपक हरिमकर यांची ओबीसी महिला जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार कडून मुंबई येथे आयोजित पक्ष कार्यक्रमात राजा राजापूरकर प्रदेशाध्यक्ष ओबीसी यांच्या मार्फत नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांचे हस्ते ,राष्ट्रीय नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत हे नियुक्ती पत्र देण्यात आले . अर्चना हरिमकर ह्या पुसद येथील नामांकित शाळेत अध्यापनाचे कार्य करीत असून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय महिला असून महिला सक्षमीकरनासाठी त्यांची पक्षस्तरावर नियुक्ती जिल्ह्यासाठी महत्वपूर्ण राहणार आहे. पक्षाची विचारधारा राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनां अभिप्रेत असणारी संघटना व पक्ष बांधणी करून शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांचे पुरोगामी विचार तळागाळा पर्यंत पोहचवण्यासाठी त्या प्रयत्नशील राहनार असल्याचे प्रा. अर्चना हरिमकर वृत्त संस्थांशी बोलताना म्हणाल्या. या निवडीचे श्रेय शरद मैंद प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व पक्षातील पुसद विभागातील सर्व कार्यकर्त्यांना प्रा. अर्चना हरिमकर देतात.

## महामार्गावर भीषण अपघात; आयशर ट्रकच्या धडकेत क्लीनरचा मृत्यू.

**▸विदर्भ केसरी।मूर्तिजापूर**




राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर पोलीस स्टेशन माना अंतर्गत येणाऱ्या मलकापूर शिवारात आज पहाटे एक भीषण अपघात घडला. भरधाव वेगाने येणाऱ्या आयशर ट्रकने उभ्या ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात क्लीनरचा जागीच मृत्यू झाला असून, दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चालक प्रल्हाद पडोलीया (रा. नागपूर) हे आपल्या मालवाहू ट्रकने (क्र. MH 40 BG 0844) भुसावळ येथून नागपूरच्या दिशेने जात होते. ५ एप्रिल २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास मलकापूर येथील पेट्रोल पंपासमोर त्यांचा ट्रक असताना, पाठीमागून येणाऱ्या आयशर ट्रकने (क्र. MH 40 CT 7229) त्यांना भीषण धडक दिली. आयशर ट्रक चालक रामायण श्रीकांत पांडे (रा. नागपूर) हा वाहन अत्यंत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवत असल्याने हा अपघात घडल्याचे सांगण्यात येत आहे.

क्लीनरचा दुर्दैवी अंत
या भीषण धडकेत क्लीनर भाईलाल द्विवेदी यांना गंभीर दुखापत झाली. धडक इतकी जोरात होती की, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच माना पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून पुढील कार्यवाही सुरू केली.
पोलीस कारवाई आणि गुन्हा दाखल
याप्रकरणी माना पोलीस स्टेशनमध्ये आरोपी ट्रक चालक रामायण पांडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलमः २८१, १०६(१) बीएनएस (BNS) सह मोटार वाहन कायदा कलम १८४. ठाणेदार गणेश नावकार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप सरोदे पुढील तपास करत आहेत.
राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या वेगामुळे अपघातांचे प्रमाण चिंतेचा विषय ठरत असून, चालकांनी रात्रीच्या व पहाटेच्या वेळी वाहन चालवताना अधिक सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## राष्ट्रवादी युवती कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निवेदन

**▸विदर्भ केसरी। कळंबतालुका प्रति :-विरेंद्र चव्हाण**



कळंब :-31 डिसेंबर 2025 पर्यंत ekyc न केलेल्या लाभार्थी यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ई के वाय सी मुदतवाढ देण्यात यावी* राष्ट्रवादी युवती कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे यांना एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय कळंब यांच्या मार्फत राष्ट्रवादी युवती कॉँग्रेस कार्याध्यक्ष मनीषा काटे (भोसले) राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष दिलीपराव इंगोले यांच्या नेतृत्वाखाली शेकडो महिलांच्या उपस्थितीत निवेदन सादर करण्यात आले.. महाराष्ट्रातील सर्वच महिलांना सुरवातीला लाभ देण्यात आला त्यानंतर ekyc करणे बंधनकारक केले व मुदत 31 डिसेंबर 2025 टेवन्यात आली.. बँक ekyc, आधार सीडीग अनेक समस्यांचा सामना महिलांना ekyc करताना करावा लागत आहेत. सव्हर प्रोब्लेम, तांत्रिक अडचण, csc सेंटरवर गर्दि , नेटवर्क प्रोब्लेम त्यामुळे महिला मोठ्या प्रमाणात ekyc करण्यापासून वंचित राहिलेल्या आहेत..

* ज्यानी ekyc केली आहेत, त्यांची दुरुस्तीच्या यादीत नावे नाहीत..

* 31 डिसेंबर 2025 दिलेल्या तारखेत ekyc न केलेल्या महिला

* आधार नंबर चुकीचे आहेत, आधार सीडीग प्रॉब्लेम आहेत

* असा अनेक लाखो महिला लाडकी बहीण योजनेपासून वंचित राहिलेल्या आहेत... लाडकी बहीण योजनेत ज्या गरजू, परिस्थिती बेताची असलेल्या महिला मोठ्या प्रमाणात वंचित आहेत.. असा कळंब तालुक्यातील नव्हे तर महाराष्ट्रातील समस्त महिलांना मुदतवाढ देऊन दिलासा देण्यात यावा व त्यांचा लाभ त्यांना देण्यात यावा... अन्यथा आंदोलनाला सामोरे जाऊ असा ईशारा निवेदनाच्या माध्यामातून देण्यात आला.. यावेळी दिलीप इंगोले, सुधाकर निखाडे, विजय पोटे, प्रशांत भोयर, सुषमा पाटील, ओमकार चव्हाण, अरुणा अतकरे, नागोराव किन्हेकर, रंजना ठोंबरे, किरण सूर्यवंशी, शकीला शेख, पपिता पाटील, रुपाली देवाडे, नंदा शिरसागर, लक्ष्मण घोडाम, वैशाली राऊत, वनमाला नेहारे, रंजना उईके, सविता डंभारे, सुनीता थुल, सुमित्रा गेडाम, नंदा पारीसे, सपना करलुके, शांता बावणे, शीतल नागोसे, माधुरी ढोंगे, शीतल भोंडे, मंदा आत्राम, मंगला घोटेकर, काजल पारिसे, सविता गुजर, पपिता मेश्राम, ताई मडावी, उषा रामेकर, जयश्री हजारे, सुलोचना कासार, लता बावणे, गुंफा आसुटकर, सविता खैरकार, ज्योत्स्ना बावणे, सुनीता नागपुरे, राधा सावरकर, पुष्पा कासारकर, अनिता वडे, कांता चव्हाण, नलिनी उईके , भाग्यश्री रोटे, अनु लिलारे, गुंफा उईके, सुनीता मडावी, रंजना वाघमारे, शेकडो महिला लाभार्थी उपस्थित होत्या....

## रिसोडच्या तहसील कार्यालयावर 'चुलीचा' धूर

**▸विदर्भ केसरी। -प्रदिप खंडारे**



**रिसोड** "नरेंद्र, कब मिलेगा सिलेंडर?" अशा गगनभेदी घोषणा आणि चुल पेटवून त्यावर भाकरी थापत आज रिसोड तहसील कार्यालयाचा परिसर वंचित बहुजन आघाडीच्या आंदोलनाने दणाणून गेला. तालुक्यात गॅस सिलेंडरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाल्याने संतप्त झालेल्या वंचितच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी (६ एप्रिल)अनोख्या पद्धतीने प्रशासनाचा निषेध नोंदवला. विशेष म्हणजे प्रशासकीय उंबरठ्यावर मांडली चूल गेल्या काही दिवसांपासून रिसोड शहर आणि तालुक्यात गॅस सिलेंडरच्या पुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. वारंवार मागणी करूनही सर्वसामान्यांना सिलेंडर मिळत नसल्याने गृहिणींचे स्वयंपाकघर कोलमडले आहे. या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी वंचित बहुजन आघाडीने आक्रमक पवित्रा घेतला.कार्यकर्त्यांनी थेट तहसील कार्यालया समोरच लाकडे जमवून चूल पेटवली. भर उन्हात चुलीवर भाकरी थापून 'अच्छे दिन'च्या घोषणांचा अक्षरशः धूर काढला. 'नरेंद्र, कब मिलेगा सिलेंडर?'च्या घोषणांनी परिसर दणाणला आंदोलना दरम्यान कार्यकर्त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. "सिलेंडरच्या किमती गगनाला भिडल्या असताना आता ते मिळेनासेही झाले आहेत,मग सर्वसामान्यांनी जगायचे कसे?" असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.

"नरेंद्र, कब मिलेगा सिलेंडर?" या घोषणांनी उपस्थित सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रिकामे सिलेंडर समोर ठेवून करण्यात आलेल्या या आंदोलनामुळे तहसील परिसरात काही काळ तणावाचे वातावरण होते. तहसीलदारांना दिले निवेदन आंदोलनानंतर वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने तहसीलदार तेजनकर मॅडम यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.यावेळी उपस्थित तालुका अध्यक्ष महेश तिडके, जेष्ठ नेते रविंद्र मोरे, गिरिधर शेजुळ, विजय सिरसाट, शालिग्राम पठाडे,माधव हिवाळे,माजी शहराध्यक्ष प्रदिप खंडारे,जियाउर खान, गजानन खंडारे,मंदाताई वाघमारे, मंदाताई धांडे,प्रकाश गवई, कैलास सर्वे,विनोद अंभोरे, अरुण बोरकर,गजानन शिंदे, सदानंद गायकवाड, दत्ताराव जुमडे,कैलास पंडित,प्रशांत मोरे, संदिप मोरे, समाधान जमधाडे,गुलाब मस्के,मंगेश राजुरकर,विनोद भगत, जितेंद्र जमदाडे,प्रविण खैरे,धनंजय पंडित,शुभम लेमाडे, शुभम जुमडे,आव्हाट,व आदि पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## तालुकास्तरीय आरोग्य जनसंवाद संपन्न

**▸विदर्भ केसरी। राजहंस शेंडे**




कुही (जि. नागपूर) : इकोनेट संस्थेच्या पुढाकारातून कुही तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांतील आरोग्य सेवांचा सखोल अभ्यास करून नागरिक, आरोग्य विभाग व प्रशासन यांच्यात थेट संवाद साधण्यासाठी कौशल्य मंगल कार्यालय येथे तालुका स्तरीय आरोग्य जनसंवाद कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला तालुका आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश चकोले, तहसीलदार डॉ. अमित घाडके, प्रतिमा कावळे तसेच राहुल साळवी, सुनीता देशमुख, रविंद्र कूरडकर उपस्थित होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सोमेश्वर चांदूरकर, समीक्षा गणवीर, संगीता पडोळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

तितुर व साळवा प्राथमिक आरोग्य केंद्रांअंतर्गत गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत आरोग्य सेवा, ॲम्बुलन्स सुविधा व औषधांच्या उपलब्धतेबाबत अडचणी मांडल्या. महिलांनी जननी सुरक्षा योजना व मातृत्व वंदना योजनेतील अडथळ्यांकडे लक्ष वेधले. यावर अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सेवा अधिक प्रभावी करण्याचे आश्वासन दिले. तसेच नागरिकांच्या कागदपत्रांच्या अडचणी सोडवण्यासाठी लवकरच विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात तितुर व साळवा प्राथमिक आरोग्य केंद्रांसह डोंगरगाव, माळणी व चाफेगडी उपकेंद्रांच्या स्थितीवरही चर्चा झाली. प्रशासन व आरोग्य विभागाने समन्वयातून सेवा अधिक सक्षम करण्याची तयारी दर्शवली.

- **कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इकोनेट संस्था तसेच विनोद पवार, सुभाष मेश्राम, रजनी पवार, दीपक राजपूत, ऋषी माडी, प्रशांत पवार, धीरज पवार, मयूर पवार व इतर स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.**

# उमरखेड येथे तालुका कॉँग्रेस कमिटीची सभा संपन्न

### अनुसूचित जाती विभागाच्या कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या जाहीर

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी उमरखेड : मिलिंद चिकाटे**



नुकतीच उमरखेड कॉँग्रेस कमिटीची अनुसूचित जाती विभाग प्रमुखाची सभा महाराष्ट्र कॉँग्रेस कमिटीचे सरचिटणीस साहेबराव कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली .यामध्ये तालुका कॉँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग जिल्हा परिषद व पंचायत समिती सर्कल प्रमुख व उमरखेड शहर अध्यक्ष अनुसूचित जाती विभाग पदी नियुक्तया करण्यात आल्या आहेत त्यामध्ये तालुकाध्यक पदी कैलास राऊत, गांजेगाव तर तालुका समन्वयक पदी भारत हनवते यांची निवड करण्यात आली राहुल काळबांडे उमरखेड शहर अध्यक्ष अनुसूचित जाती विभाग, सौ ज्योतीताई विनायकराव ढोले संगम चिंचोली उमरखेड तालुका कॉँग्रेस महिला संघटक अनुसूचित जाती पदी श्रीमती केशर ताई परसराम पाईकराव बोरबन उमरखेड शहर महिला संघटक अनुसूचित जाती, श्री प्रियदर्शी खडसे राहणार मुळावा उमरखेड तालुका कॉँग्रेस जिल्हा परिषद मुळावा सर्कल प्रमुख पदी अनुसूचित जाती श्री विलासराव वाहुळे, उमरखेड तालुका कॉँग्रेस जिल्हा परिषद पोफाळी सर्कल प्रमुख पदी अनुसूचित जाती विभाग श्री देवराव बरडे,बोथामाळ यांची उमरखेड तालुका कॉँग्रेस सुकळी पंचायत समिती सर्कल प्रमुख पदी अनुसूचित जाती विभाग श्री संदीप राऊत उमरखेड तालुका कॉँग्रेस ब्राह्मणगाव पंचायत समिती सर्कल प्रमुख अनुसूचित जाती विभाग यांची नियुक्ती जिल्हा अध्यक्ष श्री महेंद्रजी कावळे अनुसूचित जाती विभाग व श्री रामराव गायकवाड कार्याध्यक्ष अनुसूचित जाती विभाग यांचे आदेशाने केलेली आहे . त्यांचे साहेबरावजी कांबळे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस यांच्या हस्ते व महेद्र कावळे आणि रामराव गायकवाड जिल्हा कार्याध्यक्ष यांच्या आदेशाने नियुक्तीपत्र देण्यात आले आहे . यावेळी पंकज गायकवाड अंभियत्ता उमरखेड,गौतम दवणे हजर होते . नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी कॉँग्रेस पक्षाचे ध्येयधोरण तळागाळातील घटकापर्यंत नेण्याचा प्रयत्न करून संघटन बळकट करण्याचा मानस व्यक्त केला यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांचे खूप खूप अभिनंदन करण्यात आले आहे त्यांच्या नियुक्तीमुळे सर्वांना आनंद होत आहे

## पैशाच्या वादात महिलेवर कुऱ्हाडीने जिवघेणा हल्ला

**▸विदर्भ केसरी। उमरखेड :-**

उसनवारीने दिलेले पैसे तगादा लाऊन का मागतेस म्हणून वाद निर्माण करून कुऱ्हाडीचे सपासप वार करून आरोपीने सीमा चक्रधर देवसरकर वय (32 ) वर्षे रा देवसरी यांच्यावर प्राण घातक हल्ला केल्याची घटना दि 6 एप्रील रोजी सायंकाळी 7 वाजताचे सुमारास घडली आहे .

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सीमा चक्रधर देवसरकर या महिलेने मागील एक महिन्यापूर्वी आरोपी राजेश पवार वय (32) वर्षे रा .देवसरी यास तीनशे रुपये उसने दिले होते .सदर महिलेने उसनवारीचे पैसे दे असे म्हटले असता मी काय पळून चाललो का असे म्हणून वाद निर्माण करून सायंकाळी सात वाजताचे सुमारास आरोपी राजेश पवार हा सदर महिलेच्या घरी हातात कुऱ्हाड घेऊन आला .व तू मला पैशाचा तगादा लावतेस का म्हणून सीमा देवसरकर हिचे डोक्यावर ,डाव्या कानावर, डाव्या कमरेवर कुऱ्हाडीचे सपासप वार करून गंभीर रित्या जखमी केले .महिलेला जखमी अवस्थेत उमरखेड येथील रुग्णालयात दाखल केले असता तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नांदेडच्या शासकीय रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला . तिचेवर नांदेड येथे उपचार सुरू असून सदर महिलेचा जबाब नोंदविण्यासाठी जमादार नरेंद्र पुंड हे नांदेड येथे रवाना होऊन त्यांनी महिलेचा जबाब नोंदविला .ठाणेदार शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार नरेंद्र पुंड पुढील तपास करीत आहेत .

# विदर्भ GOOD MORNING

!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## भरडधान्यासाठी खरेदीसाठी नऊ केंद्र सुरु ३० एप्रिलपर्यंत मुदत

■ यवतमाळ : रब्बी पणन हंगामांतर्गत राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत ज्वारी, बाजरी, मका व रागी या भरडधान्य खरेदीसाठी जिल्ह्यातील महागाव, पांढरकवडा,पाटण, पुसद, आर्णी,उमरखेड, घाटंजी व राळेगांव, या नऊ तालुक्यात खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहे. खरेदी केंद्रांमध्ये तालुका खरेदी विक्री समिती महागांव, तालुका खरेदी विक्री समिती पांढरकवडा, बळीराजा फळे फुले भाजीपाला कृषी उत्पादन पणन व प्रक्रिया सहकारी संस्था पाटण, पुसद तालुका खरेदी विक्री समिती पुसद, आर्णी तालुक्यात शेतकरी कृषी खाजगी बाजार दत्तरामपुर, आर्णी, उमरखेड तालुक्यात खरेदी विक्री समिती उमरखेड,घाटंजी तालुक्यातील खरेदी विक्री समिती घाटंजी,कळंब तालुक्यात खरेदी विक्री समिती कळंब,राळेगांव तालुक्यात खरेदी विक्री समिती राळेगांव या केंद्रांचा समावेश आहे.

# खरात विरोधात माकपचा एल्गार

### खरात ला मदत करणाऱ्या ३९ आमदारांवर नावे जाहीर करून त्यांच्यावर कारवाई करा - मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची मागणी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

यवतमाळ : बुवाबाजीला शरण जात राज्यातील ३९ आमदार अशोक खरातच्या तंत्र-मंत्र भोंदूगिरीत सामील झाल्याचे आरोप होत आहेत. अशा आमदारांची यादी राज्य सरकारने तातडीने जाहिर करावी व या आमदारांचे राजीनामे घ्यावेत तसेच पीडित महिलांचे समाजमाध्यमांवर वायरल होणारे व्हिडिओ हटविण्यात यावे आणि प्रत्येक पो. स्टे . मध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष सुरू करून क्रियान्वित करावे अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट केली असून या मागणीसाठी दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी राज्यव्यापी आंदोलनतर्गत वणी, मारेगाव व यवतमाळ येथे मा.



जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना निवेदने देण्यात आली आहे.

निवडून गेलेले लोकप्रतिनिधी संविधानिक पदावर असतात. संविधानाने त्यांच्यावर वैज्ञानिक दृष्टिकोन अंगिकारण्याची व तो जनतेत रुजवण्याची जबाबदारी दिली आहे. ही संविधानिक जबाबदारी पार न पाडता या उलट वर्तन करणे म्हणजे लोकप्रतिनिधी म्हणून संविधानाने टाकलेली जबाबदारी पार न पाडणे आहे. अशा लोकप्रतिनिधींच्या निमित्ताने तंत्र-मंत्र, जादू-टोणा इत्यादी अंधश्रद्धेच्या गोष्टींना राजमान्यता मिळत असते. त्यामुळे सामान्य जनताही अशा भोंदू बाबांच्या भोंदूगिरीला बळी पडत असते. भोंदू बाबा जितके गुन्हेगार आहेत तितकेच गुन्हेगार त्यांना समर्थन देणारे, शरण जाणारे व आपल्या अनुयायांना बुवा-बाबांवर विश्वास ठेवण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दिशानिर्देश करणारे लोकप्रतिनिधीही गुन्हेगार आहेत. अशा गुन्हेगारांवर तत्काळ कारवाई करावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करीत आहोत.

भोंदू बाबा अशोक खरात याच्या शोषणाला बळी पडलेल्या अनेक महिलांचे वाईट व्हिडिओ मोठ्या प्रमाणात समाज माध्यमांवर फिरत आहेत. त्यामुळे बळी पडलेल्या महिलांच्या सामाजिक प्रतिष्ठेला ठेच पोहोचत आहे. असे व्हिडिओ समाज माध्यमांतून तातडीने हटविण्याची कारवाई राज्य सरकारने करावी अशी मागणीही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करीत आहे. सोबतच, प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्षाची स्थापना करून ते कार्यान्वित करण्याचा शासन निर्णय त्वरित अमलात आणा, जादूटोणा विरोधी कायद्याचे नियम तयार करून सदर कायद्याची कठोर अंमलबजावणी करा व सोशल मीडियातून होणाऱ्या बाबा-बुवा, ज्योतिषी, मंत्र-तंत्र यांच्या अंधश्रद्धा पसरवणाऱ्या जाहिरातींचे नियमन करणारी स्वतंत्र यंत्रणा तातडीने तयार करा, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या आहेत.

यावेळेस यवतमाळ येथे माकपचे जिल्हा सचिव कॉ. ॲड. कुमार मोहरमपूरी, कॉ. ॲड. डी बी नाईक, कॉ. चंद्रशेखर सिडाम, कॉ. देविदास मोहकर, कॉ. मनीष इसाळकर, कॉ. अनिता खुनकर, कॉ. ऊषा मुरखे, कॉ. रमेश मिरासे, कॉ. संदीप सुरपाम यांनी तर वणी येथे गजानन ताकसांडे, बादल कोडापे, कवडू चांदेकर, संजय वालकोंडे, शंकर गाऊत्रे, अमोल चटप, संभा टांगे, अशोक गेडाम, भीमराव आत्राम व अन्य आणि मारेगाव येथे रामभाऊ जिद्दीवार, श्रीकांत तांबेकर, बंडू मत्कुलवार, सुदर्शन टेकाम आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### जिल्ह्यात लक्षित गटाचे परिवार सर्वेक्षणास बुधवारपासून प्रारंभ

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ, दि.7 (जिमाका)**

: महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विविध योजना व उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांच्या लक्षित गटातील कुटुंबांची माहिती संकलित करणे, त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे आणि त्या आधारे अधिक परिणामकारक योजना तयार करण्याच्या उद्देशाने "लक्षित गटाचे परिवार सर्वेक्षण" अभियान हाती घेण्यात आले आहे. हे सर्वेक्षण अभियान जिल्ह्यात दि. ८ एप्रिल ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या अभियानाद्वारे जास्तीत जास्त पात्र कुटुंबांपर्यंत अमृत संस्थेच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती पोहोचविणे तसेच त्यांच्या अभिप्रायाच्या आधारे भविष्यातील योजनांची आखणी करण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच, सर्वेक्षणाच्या माध्यमातून भविष्यातील योजना अधिक परिणामकारक व लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), यवतमाळ यांनी दिली आहे.

### शासकीय संगणक टंकलेखन परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्ती लाभ

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ, दि.7 (जिमाका)**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स (जीसीसी-टीबीसी) लघुलेखन परीक्षा दरवर्षी जून व डिसेंबर महिन्यात ऑनलाईन पद्धतीने घेतल्या जातात. जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल १० मार्च २०२६ रोजी जाहीर करण्यात आला आहे. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अमृत संस्थेच्या लक्षित गटातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परतावा (प्रतिपूर्ती) देण्यात येणार आहे. या लक्षित गटामध्ये ब्राह्मण, कायस्थ, कोमटी, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू, कम्मा, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगूनथर, गुजराथी, ठाकूर, जाट, हिंदू नेपाली, भूमिहार, लोहाणा, कानबी आदी घटकांचा समावेश आहे. हा लाभ मिळविण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अमृत संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर https://mahaamrut.org.in/ ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत असून अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० एप्रिल २०२६ आहे. गत आर्थिक वर्ष (सन २०२५-२६) किंवा पुढील आर्थिक वर्ष (सन २०२६-२७) साठी लागू असलेले उत्पन्न प्रमाणपत्र किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्र,राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र,लक्षित गटाची जात नमूद असलेला शासकीय पुरावा शाळा सोडल्याचा दाखला / शाळा निर्गम प्रमाणपत्र, जानेवारी २०२६ परीक्षेत उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र बँक खात्याच्या तपशीलासाठी पासबुक किंवा रद्द केलेला धनादेश याची स्पष्ट प्रत पात्र विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), यवतमाळ यांनी केले आहे.

### नाफेडचे सहा चना खरेदी केंद्र सुरु

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ, दि. 7 :(जिमाका) :**

खरीप पणन हंगामांतर्गत आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत चना खरेदीसाठी नाफेडमार्फत जिल्ह्यातील महागाव, पांढरकवडा, दिग्रस, पाटण, पुसद व आर्णी या सहा ठिकाणी खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहे. खरेदी केंद्रांमध्ये तालुका खरेदी विक्री संघ मर्या. महागांव, तालुका खरेदी विक्री संघ मर्या. पांढरकवडा, खरेदी विक्री संघ मर्या दिग्रस, बळीराजा फळे फुले भाजीपाला कृषी उत्पादन पणन व प्रक्रिया सहकारी संस्था मर्या.पाटण, पुसद तालुक्यात किसान मार्केट यार्ड शेलु (बु), पुसद व शेतकरी कृषी खाजगी बाजार दत्तरामपुर, आर्णी या केंद्रांचा समावेश आहे. जिल्ह्यातील चना खरेदी ही 15 एप्रिलपर्यंत करण्यात येणार असून चना खरेदीकरिता ऑनलाईन नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी आधारकार्ड, 7/12 उतारा, पिकपेरा व बॅकेचे पासबुकची झेरॉक्स प्रत ही आवश्यक कागदपत्रे संबंधित खरेदी केंद्रावर स्वत: हजर राहून नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा मार्केटिंग अधिकारी प्र. विजय गाढवे यांनी केले आहे.

### शस्त्र बाळगणारा गजाआड

**▸विदर्भ केसरी।उमरखेड**

प्रवासी बस निवारा परिसरात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने धारदार शस्त्रांसह थांबलेल्या २१ वर्षीय तरुणाला पोलिसांनी रंगेहात अटक केली. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चिल्ली येथे मंगळवारी (ता. ७)दुपारी ४ वाजताच्या दरम्यान केली आहे. आरोपीकडून एक लोखंडी तलवार, मोठा सुरा आणि चाकू असा एकूण २,२०० रुपये किमतीचा शस्त्र जप्त करण्यात आले आहे. या कारवाईबाबत सविस्तर माहिती अशी की, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ७ एप्रिल रोजी उमरखेड उपविभागात गस्त घालत असताना, चिल्ली येथील सैय्यद ईरफान सैय्यद मुस्तफा हा तरुण गुलाबी रंगाच्या प्लास्टिक पोत्यात बेकायदेशीर शस्त्रे घेऊन बस स्थानकावर थांबल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था भंग होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी दोन पंचासमक्ष तातडीने छापा टाकला.

# रग्बी प्रशिक्षण शिबिरातून खेळाडूंची झेप

### राष्ट्रीय शालेय स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुला व मुलींच्या संघांचा तिसरा क्रमांक

**▸विदर्भ केसरी। अकोला-**

अकोला जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित पूर्वतयारी रग्बी प्रशिक्षण शिबिराला यश लाभले असून, या शिबिरातून तयार झालेल्या महाराष्ट्राच्या 17 वर्षांखालील मुला व मुलींच्या संघांनी राष्ट्रीय शालेय स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. हे प्रशिक्षण शिबिर 30 मार्च ते 4 एप्रिल दरम्यान अकोल्यात आयोजित करण्यात आले होते. जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारचे रग्बी प्रशिक्षण शिबिर भरविण्यात आल्याने खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण होते.





अहिल्यानगर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय रग्बी स्पर्धेतून 17 वर्षांखालील मुला-मुलींची निवड करण्यात आली होती. या निवडलेल्या खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेसाठी सक्षम बनविण्याच्या उद्देशाने हे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले. रग्बी हा वेग, ताकद आणि संघभावना यांचा संगम असलेला खेळ असून 'रग्बी सेव्हन्स (7s)' प्रकारात प्रत्येकी 7 खेळाडूंचा संघ कमी वेळेत जलद व रोमांचक सामने खेळतो. या शिबिराद्वारे खेळाडूंमध्ये तांत्रिक कौशल्य, फिटनेस आणि रणनीती विकसित करण्यात आली. शिबिरात रग्बी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मार्फत तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले. मुंबईचे अनुभवी प्रशिक्षक महेश राठोड यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. महाराष्ट्रातील विविध भागांतून मोठ्या संख्येने 17 वर्षांखालील खेळाडू सहभागी झाले होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश भट, क्रीडा अधिकारी राजेश गावंडे, निशांत वानखडे तसेच सर्व क्रीडा अधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अकोला जिल्हा रग्बी असोसिएशनचे अध्यक्ष प्रेमराज शर्मा, सचिव ज्ञानेश्वर टाले, सहसचिव अमित मनवर यांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. दरम्यान, या प्रशिक्षणानंतर दोन्ही संघांनी 4 एप्रिल 2026 रोजी ओडिशा राज्यातील भुवनेश्वर येथील कलिंगा स्टेडियमवर झालेल्या राष्ट्रीय शालेय रग्बी स्पर्धेत सहभाग नोंदवला. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुला व मुली दोन्ही संघांनी तिसरा क्रमांक पटकावला. या संघासाठी व्यवस्थापक म्हणून राजू उगवेकर तसेच क्रीडा अधिकारी राजेश गावंडे यांनी महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली.

## जीवनाला नवा आधार! कॅन्सरग्रस्त महिलेस ३ लाखांची मदत

**▸विदर्भ केसरी। पुसद | प्रतिनिधी**

पुसद येथील देवीवॉर्ड परिसरातील रेखा किशोर पडघणे (वय ४७) यांना बिलॅटरल कार्सिनोमा ब्रेस्ट या गंभीर आजाराचे निदान झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले होते. महागड्या उपचारांसाठी लागणारा खर्च परवडत नसल्याने कुटुंबीय चिंतेत होते. नागपूर येथील वोकार्ट रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी केमोथेरपी व टार्गेट थेरपी करण्याचा सल्ला दिला. या उपचारांसाठी सुमारे ८ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याने कुटुंबीयांसमोर मोठे आर्थिक आव्हान उभे राहिले होते. दरम्यान, गरजू रुग्णांना मदत करणारे खासदार संजयभाऊ देशमुख यांच्याबाबत माहिती मिळाल्यानंतर पडघणे कुटुंबीयांनी दिग्रस येथील वैद्यकीय मदत कार्यालयाशी संपर्क साधला. स्वीय सहाय्यक गजानन कदम यांनी तत्काळ पुढाकार घेत हे प्रकरण खासदार देशमुख यांच्या निदर्शनास आणून दिले. परिस्थितीची गंभीरता





लक्षात घेऊन खासदार संजयभाऊ देशमुख यांनी पंतप्रधान सहाय्यता निधीकडे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव पाठविण्यात आला व सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

या प्रयत्नांना यश येत रेखा पडघणे यांच्या उपचारासाठी पंतप्रधान सहाय्यता निधीतून ३ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली. मंजुरीचे पत्र मिळताच कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला. अडचणीच्या काळात मिळालेल्या या मदतीबद्दल पडघणे कुटुंबीयांनी खासदार संजयभाऊ देशमुख यांचे मनःपूर्वक आभार मानले. "अशा संवेदनशील लोकप्रतिनिधींची समाजाला नितांत गरज आहे," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

## गांजा विक्री करणारा जेरबंद

**▸विदर्भ केसरी। पुसद**

पुसद शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील हनुमान वार्ड परिसरातील पूस नदीच्या बांधालगत गांजाची अवैध विक्री करणाऱ्या एका इसमाला पोलिसांनी रंगेहात पकडून ताब्यात घेतले आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी.जे. यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी, ६ एप्रिल रोजी ही धडक कारवाई करण्यात आली. आरोपीकडून ३२४ ग्रॅम प्रतिबंधित गांजा जप्त करण्यात आला असून, त्याची अंदाजे किंमत ५,१८४ रुपये असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले आहे.

हनुमान वार्ड परिसरात एक व्यक्ती अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी बाळगून असल्याची खात्रीलायक माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस अधीक्षक हर्षवर्धन बी.जे. यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रेमकुमार केदार यांच्या नेतृत्वाखाली एक विशेष पथक छापा टाकण्यासाठी पाठवले. या पथकाने पूस नदीच्या तीरावर सापळा रचून मोहम्मद हबीब मोहम्मद हदीस (वय २९ वर्ष, रा. मुजफ्फरपूर, सध्या मुक्काम गडी वार्ड, पुसद) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे असलेल्या प्लास्टिक पिशवीत मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणारा प्रतिबंधित गांजा आढळून आला.

उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार सध्या संपूर्ण उपविभागात अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम राबवली जात आहे. या छाप्यानंतर पोलिसांनी अमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, अशा कारवाया भविष्यातही सातत्याने सुरू राहतील, असा इशारा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.

## महसूल प्रशासन गाफील? दिवसा 'शांत' दिसणारे रेती घाट रात्री मात्र 'धगधगते'!

**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड -:**

जिल्यातील तालुक्यासह ग्रामीण भागात सध्या रेती घाटांच्या लिलावावरून आणि त्यांच्या वैधतेवरून मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, प्रशासनाच्या कागदोपत्री जे घाट अधिकृत म्हणून घोषित करण्यात आले आहेत, तिथे दिवसा सामसूम असते, मात्र सूर्यास्त होताच रेती तस्करीचा 'अंधेरा खेळ' सुरू होतो. दिवसा अधिकृत वाळू उपसा बंद आणि रात्री मात्र रेतीची अवैध वाहतूक सुरू, यामुळे हे घाट नेमके अधिकृत आहेत की अवैध? असा पेच सामान्य नागरिकांना पडला आहे.



परिसरातील ग्रामीण भागात सध्या रात्रीच्या सुमारास मोठ्या प्रमाणात रेतीची वाहतूक होताना दिसत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, दिवसा महसूल विभागाचे पथक कारवाई करेल या भीतीने घाटावर शुकशुकाट असतो. परंतु, रात्रीच्या वेळी पोकल्याण्ड आणि ट्रक (ट्रिपर )साहाय्याने मोठ्या प्रमाणात उपसा केला जातो. शहरात आणि लगतच्या ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी रेतीची वाहतूक करणारे ट्रिपर सुसाट वेगाने धावत असल्याने अपघाताची भीतीही वाढली आहे. महसूल प्रशासनाकडून रेती तस्करांवर नजर ठेवली जात असल्याचे दावे केले जात असले, तरी प्रत्यक्षात चित्र वेगळे आहे. "जर घाट अधिकृत आहेत, तर मग रात्रीच उपसा का होतो?" असा रोकडा सवाल गावकरी विचारत आहेत. नियमानुसार, वाळू उपसा आणि वाहतुकीसाठी ठराविक वेळ निश्चित केलेली असते. मात्र, ग्रामीण परिसरात रात्री पडणारी ही 'रेती' नियमांची पायमल्ली करत आहे.

**■ नागरिकांच्या मनात शंकांचे मोहोळ**

अनेक ठिकाणी अधिकृत घाटांच्या नावाखाली लगतच्या प्रतिबंधित क्षेत्रातूनही रेती उपसली जात असल्याची चर्चा आहे. रात्रीच्या सुमारास पडणारी रेती नेमकी येते कुठून आणि तिला कोणाचे अभय आहे, हे कोडे अद्याप सुटलेले नाही. महसूल विभागाने याकडे दुर्लक्ष केल्यास पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. प्रशासनाने केवळ कागदोपत्री कारवाई न करता, रात्रीच्या वेळी घाटांवर अचानक धाडी टाकून हा 'रात्रीचा खेळ' थांबवावा, अशी मागणी परिसरातील जनतेकडून होत आहे.

# गोड बोल, खिशात घाव!

### निधी बँका, (अर्बन बँक) पतसंस्था व मल्टिस्टेट कंपन्यांचा गाशा गुंडाळण्याचा सिलसिला चालूच तर आता भूअंकुर प्रा लिमिटेड गंडा घालून फरार...!

**■ "यांना आशीर्वाद कुणाचा...?" असा सवाल सर्वसामान्य नागरिकांमधून उपस्थित केला जात असून या संपूर्ण प्रकरणामागील सूत्रधारांपर्यंत पोहोचण्याची मागणी होत आहे. अनेक पतसंस्था बँक मल्टिस्टेट निधी अर्बन मध्ये अनेक लोकांना वसुलीचे १५६ चे अधिकार नाही काही मॅनेजर तर स्वतःला अध्यक्ष किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा शाखा प्रबंधक समजत आहेत. अती प्रमाण मध्ये खर्च होत असल्याची चर्चा प्रॉपर्टी मध्ये वाढ आलिशान गाडी खरेदी केल्याची चर्चा..?**

**▸विदर्भ केसरी।यवतमाळ :**

यवतमाळ जिल्ह्यात सहकार क्षेत्रावर पुन्हा एकदा विश्वासघाताची काळी छाया पडली असून विविध निधी बँका, पतसंस्था आणि मल्टिस्टेट शेअर्स मार्केट कंपन्या एकामागून एक गाशा गुंडाळत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या प्रकारामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या घामाच्या पैशांवर मोठा घाला बसला असून ठेवीदारांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.



विशेषतः जनसंघर्ष निधी अष्टविनायक पतसंस्था (महिला बँक) भू अंकुर प्रा लिमिटेड तसेच काही तथाकथित गुंतवणूक कंपन्यांनी अचानक कार्यालये बंद केल्याने ठेवीदारांना मोठा धक्का बसला आहे. "जास्त परतावा, सुरक्षित गुंतवणूक" अशा आमिषांना बळी पडून अनेकांनी लाखो रुपयांची गुंतवणूक केली होती. सुरुवातीला काही ठिकाणी नियमित परतावा देऊन विश्वास संपादन करण्यात आला, मात्र मोठ्या प्रमाणावर ठेवी जमा झाल्यानंतर संस्थांनी अचानक पलायन केल्याचे उघड होत आहे.

या कंपन्यांनी आकर्षक योजना, बोनस आणि अल्पावधीत दुप्पट परताव्याची आश्वासने देत गावोगावी आपले जाळे विस्तारले. एजंट आणि मार्केटिंगच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना जाळ्यात ओढण्यात आले. अनेकांनी बचत गट, शेतीमाल विक्री आणि मेहनतीच्या कमाईतून पैसे गुंतवले होते. मात्र आता हे सर्व पैसे अडकून पडल्याने अनेक कुटुंबांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणामागे एकाच साखळीतील जाळे कार्यरत असल्याचा संशय व्यक्त होत आहे. विविध संस्थांमधील कर्मचारी, मॅनेजर आणि व्यवस्थापन यांच्यातील परस्पर संबंधांची चर्चा रंगत असून काही व्यक्ती वेगवेगळ्या संस्थांमध्ये सक्रिय असल्याचे बोलले जात आहे. "एकाच माळेचे मणी" अशा पद्धतीने हे नेटवर्क कार्यरत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याशिवाय काही ठिकाणी कमिशनच्या आधारे बोगस कर्जवाटप झाल्याची माहिती समोर येत असून आर्थिक गैरव्यवहाराचे स्वरूप अधिक गंभीर असल्याचे संकेत मिळत आहेत. या घटनांमुळे ठेवीदारांनी प्रशासनाकडे धाव घेतली असून तक्रारींचा ओघ वाढत आहे. मात्र अद्याप ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. सहकार क्षेत्रातील प्रामाणिक संस्थांवरही या घटनांचा परिणाम होत असून संपूर्ण व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित संचालक व अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, ठेवीदारांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी विशेष यंत्रणा उभारावी आणि अशा बोगस संस्थांवर कायमस्वरूपी कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

दरम्यान, नागरिकांना सावध राहण्याचे आवाहनही करण्यात येत आहे. अवास्तव परताव्याचे आमिष दाखवणाऱ्या योजनांपासून दूर राहावे, फक्त अधिकृत व नोंदणीकृत संस्थांमध्येच गुंतवणूक करावी आणि कोणतीही गुंतवणूक करण्यापूर्वी कागदपत्रांची खातरजमा करावी, असे आवाहन करण्यात येत आहे. ही घटना केवळ आर्थिक फसवणुकीपुरती मर्यादित नसून सहकार व्यवस्थेवरील जनतेच्या विश्वासाला तडा देणारी ठरत आहे. आता प्रशासन किती जलद, पारदर्शक आणि कठोर पावले उचलते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आरोग्य दिन

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात क्षयरोग (टी. बी.), स्तनाचा कर्करोग, कर्करोग, एड्स, उच्च रक्तदाब (बी.पी.), मधुमेह (शुगर) यांसारख्या आजारांवर चर्चा होऊन शारीरिक, मानसिक व सामाजिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच वैद्यकीय महाविद्यालयात आरोग्यविषयक पोस्टर स्पर्धा, प्रश्नमंजुषा, नुक्कड नाटक आदी उपक्रमांचे उत्स्फूर्त आयोजन करण्यात आले.




यावर्षीच्या जागतिक आरोग्य दिनाची थीम "आरोग्यासाठी एकत्र या, विज्ञानाच्या बाजूने उभे राहा" अशी आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे ताण-तणाव, चुकीच्या आहार पद्धती, जंक फूड व प्रक्रिया केलेल्या अन्नाचे वाढते सेवन, तसेच व्यायामाचा अभाव यामुळे विविध आजारांचे प्रमाण वाढत असल्याचे वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत उईके यांनी सांगितले. संतुलित आहार, नियमित व्यायाम, वैयक्तिक व परिसर स्वच्छता आणि मानसिक आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. या निमित्ताने नागरिकांनी दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम करावा, पौष्टिक आहार घ्यावा, तसेच तंबाखू, मद्य व अमली पदार्थांपासून दूर राहावे आणि नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. सोशल मीडियावरील आरोग्यविषयक चुकीच्या माहितीपासून सावध राहून वैज्ञानिक दृष्टिकोनातून माहितीची पडताळणी करावी, असे मत जनऔषध वैद्यकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. उमेश जोगे यांनी व्यक्त केले. तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेंद्र भुयार यांनी केले. यामध्ये आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, वयोवंदना योजना तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना यांचा समावेश आहे. या कार्यक्रमास उपअधिष्ठाता डॉ. आनंद आशिया, जनऔषध वैद्यकशास्त्र विभागातील सहायक व सहयोगी प्राध्यापक, समाजसेवा अधीक्षक, वैद्यकीय कर्मचारी, कनिष्ठ निवासी डॉक्टर, परिचारिका वर्ग तसेच रुग्णांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# “महाराष्ट्रातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा गडचिरोलीत एल्गार"

## जिल्हाधिकारी कार्यालयावर बेधडक मोर्चा व बेमुदत साखळी उपोषण

**विदर्भ केसरी । देसाईगंज**



महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत ११ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या बेरोजगार युवकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी आज राज्यभरातील ३६ जिल्ह्यांतील प्रशिक्षित युवकांनी गडचिरोली येथे एकत्र येत जोरदार आंदोलन छेडले. या आंदोलनामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयावर बेधडक मोर्चा काढण्यात आला तसेच बेमुदत साखळी उपोषणालाही सुरुवात करण्यात आली. या आंदोलनास काँग्रेस कमिटी गडचिरोलीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र भाऊ ब्राम्हणवाडे यांनी आंदोलनस्थळी भेट देत आंदोलनकर्त्यांना पाठिंबा दर्शविला व त्यांनी प्रशिक्षणार्थी युवकांशी सविस्तर संवाद साधत त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. अनेक युवकांनी यावेळी सांगितले की, ११ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण करूनही त्यांना रोजगार उपलब्ध झालेला नाही. तसेच प्रशिक्षण कालावधीत मिळणारे मानधन वेळेवर मिळाले नसून, काही ठिकाणी पूर्ण मानधन अद्याप देण्यात आलेले नाही. त्यामुळे अनेक प्रशिक्षणार्थी आर्थिक अडचणीत सापडले असून त्यांच्या कुटुंबांवर त्याचा थेट परिणाम होत आहे. प्रशिक्षणार्थ्यांच्या व्यथा ऐकताच महेंद्र भाऊ ब्राम्हणवाडे यांनी मुख्यमंत्री यांच्यावर टीका करत राज्य सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी सांगितले की, शासनाच्या निष्क्रिय भूमिकेमुळे युवकांचे भविष्य धोक्यात आले आहे. प्रशिक्षण पूर्ण करूनही युवकांना ना रोजगार मिळतो, ना त्यांचे हक्काचे मानधन वेळेवर दिले जाते—ही अत्यंत गंभीर बाब आहे. ते पुढे म्हणाले की, युवकांनी ११ महिने प्रामाणिकपणे काम करूनही त्यांच्या हातात कोणतीही स्थिरता नाही. त्यामुळे युवकांवर आणि त्यांच्या कुटुंबांवर मोठा आर्थिक व मानसिक ताण निर्माण झाला आहे. शासनाने केवळ आश्वासने देऊन वेळ मारून नेण्याऐवजी तात्काळ ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे. तसेच त्यांनी इशारा देत सांगितले की, शासनाने या प्रश्नांकडे तातडीने लक्ष दिले नाही, तर आंदोलन अधिक तीव्र होईल आणि राज्यभर त्याचे परिणाम दिसून येतील. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष अनिल कोठारे, बालाजी पा. चातुरकर साहेब (लातूर), राजेश ठाकूर, विजय लाड, सौं.मेश्राम ताई, सौं. स्वेता सातारे, नेपाल मारगाये, राहुल वासनिक, कल्पक चंद्रगिरे, किशोर फटिंग, धिवरू मेश्राम, नदीम नाथानी, गौरव येणप्रेडीवार, विपुल येल्टीवार व विविध जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

---

✔ » Selected

### सभापती रवींद्र बाबा आत्राम यांचे खमनचेरु येथील आविका सहकारी संस्थेचे सभासद पद रद्द...!

अहेरी :- तालुक्यातील खमनचेरू येथील आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे सभासद असलेले आणि माजी कॅबिनेट मंत्री व अहेरीचे विद्यमान आमदार धर्मराव बाबा आत्राम यांचे बंधू रवींद्रराव भगवंतराव आत्राम यांचे सभासद पद रद्द झाल्याने सहकार क्षेत्रात एकच खळबळ उडाली असून त्यामुळे त्यांचे अहेरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती पद देखील धोक्यात आल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे रवींद्रराव बाबा आत्राम हे यापूर्वी खमनचेरू येथील आविका सहकारी संस्थेचे सभासद म्हणून याच गटातून बाजार समितीचे संचालक म्हणून निवडून आले होते.आता त्यांचे खमनचेरू येथील आविका सहकारी संस्थेचे सभासद पदच रद्द झाल्याने त्यांचे बाजार समितीचे सभापती पद देखील धोक्यात आलेलं आहे. खमनचेरू आविका सहकारी संस्थेचे सभासद असलेल्या रवींद्रराव भगवंतराव आत्राम यांचे सभासद रद्द करावं म्हणून जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ.अजय रामय्याजी कंकडालवार यांनी 23 मार्च 2026 ला अहेरीचे सहाय्यक निबंधक कार्यालयात सबळ पुराव्यानीशी लेखी तक्रार दाखल केले होते. डॉ.कंकडालवार यांनी दाखल केलेल्या लेखी तक्रारीवरून सहाय्यक निबंधक अहेरी यांनी अर्जदार व गैरअर्जदार आणि खमनचेरू आविका संस्थेचे सचिव यांना पूर्ण संधी देऊन त्यांचे लेखी म्हणणे ऐकून घेतले. डॉ.अजयभाऊ कंकडालवार यांचा लेखी तक्रारीवरून सहाय्यक निबंधक प्रशांत गाडे यांनी अर्जदारांनी दाखल केलेल्या लेखी तक्रारीतल्या मुद्दा क्रमांक 3 नुसार आदर्श उपविधी प्रकरण 6(17) (3)नुसार संस्थेच्या कार्यक्षेत्रातील मूळ रहिवासी नसणे आणि पूर्ण जमीन विकणे किंवा हस्तातर करने,यानुसार श्री.रवींद्रराव भगवंतराव आत्राम हे आविका सहकारी संस्था मर्या,खमनचेरू संस्थेचे सभासद म्हणून अपात्र ठरत असल्याचे 6 एप्रिल 2026च्या आपल्या आदेशात म्हंटले आहे.

---

### हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांवर अन्याय? 50% कोटा व 45% गुणांची अट शिथिल करण्याची मागणी



गडचिरोली :- महाराष्ट्र राज्य हंगामी क्षेत्र कर्मचारी संघटना, जिल्हा शाखा गडचिरोली यांच्या वतीने जिल्हा हिवताप अधिकाऱ्यांना एक महत्त्वपूर्ण निवेदन देण्यात आले असून, नियमित क्षेत्र कर्मचारी भरती प्रक्रियेत हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. निवेदनानुसार, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 2023 पूर्वीपासून सुरू असलेल्या भरती प्रक्रियेत 50% कोटा हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात ही अंमलबजावणी करताना अनेक अडचणी निर्माण होत असून, हजारो हंगामी कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. संघटनेने नमूद केले आहे की, नियमित क्षेत्र कर्मचाऱ्यांसाठी 50% कोटा निश्चित करण्यात आला असला तरी, उर्वरित उमेदवारांशी स्पर्धा करतांना हंगामी कर्मचाऱ्यांना समान पातळीवर परीक्षा देणे कठीण जाते. विशेषतः किमान 45% गुणांची अट ही अनेक वर्षे प्रत्यक्ष फवारणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी अडथळा ठरत आहे. त्यामुळे अनुभव असूनही अनेकांना सेवेतून वंचित राहावे लागत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय, हंगामी कर्मचाऱ्यांनी अनेक वर्षे दुर्गम व संवेदनशील भागात जीव धोक्यात घालून काम केले असून, त्यांची सेवाभावना लक्षात घेऊन त्यांना न्याय मिळणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संघटनेने प्रशासनाकडे मागणी केली आहे की, 50% हंगामी कर्मचाऱ्यांच्या कोट्यातील भरतीसाठी स्वतंत्र व सुलभ निकष ठेवावेत किमान 45% गुणांची अट शिथिल करावी अनुभवाच्या आधारे प्राधान्य देण्यात यावे.

---

## अंतरगाव वीजपुरवठा समस्या आ. मसराम यांचा तात्काळ हस्तक्षेप!

**विदर्भ केसरी । देसाईगंज**



अंतरगाव ३३/११ के.व्ही. उपकेंद्रातील ट्रान्सफॉर्मर जळाल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वेळेवर शेत पिकांना पाणी न मिळाल्याने यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान होत असून, शेतकऱ्यांवर उपासमारीची पाळी येते की काय, अशी शेतकऱ्यांमध्ये भिती निर्माण झाली आहे. सदर घटनेची माहिती मिळताच, या क्षेत्राचे आमदार रामदासजी मसराम यांनी तात्काळ भेट देऊन, MSEDCL अधिकाऱ्यांना दोन-तीन दिवसांत ट्रान्सफॉर्मर दुरुस्त करून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश दिले. या दरम्यान स्थानिक शेतकरी व नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते आणि उपस्थित शेतकऱ्यांनी आमदारांचे आभार मानले.

---

## गडचिरोली जिल्हा अधिवक्ता संघटनेच्या अध्यक्षपदी ॲड. संजय देशमुख, तर सचिवपदी ॲड. प्रकाश भोयर

**विदर्भ केसरी । गडचिरोली**



गडचिरोली जिल्हा अधिवक्ता संघटनेची निवडणूक आज शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. दुपारी ४ वाजेपर्यंत सर्व अधिवक्त्यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर सायंकाळी ५ वाजल्यापासून मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. या निवडणुकीत अध्यक्षपदी ॲड. संजय देशमुख यांची तर सचिवपदी ॲड. प्रकाश भोयर यांची निवड झाली. तसेच उपाध्यक्षपदी ॲड. उमेश मडावी, सहसचिवपदी ॲड. उमेश कुकुडकर, कोषाध्यक्षपदी ॲड. पल्लवी केदार आणि ग्रंथपालपदी ॲड. पायल धाईत यांची निवड करण्यात आली.

कार्यकारिणी सदस्य (महिला राखीव) पदावर ॲड. प्रिया मल्लेलवार यांची निवड झाली. तर सर्वसाधारण कार्यकारिणी सदस्य म्हणून ॲड. जितेश खोब्रागडे, ॲड. हितेश थोटे, ॲड. निलीमा जुमनाके आणि ॲड. गिरीधर बांगरे हे निवडून आले. नवीन अध्यक्ष आणि सचिव यांनी आपल्या विजयाचे श्रेय वरिष्ठ अधिवक्ता ॲड. प्रमोद धाईत, ॲड. सचिन कुंभारे, ॲड. रवींद्र दोनाडकर, ॲड. नितेश लोडेल्लीवार, ॲड. अनिल चौधरी आणि ॲड. संजय भट्ट यांना दिले. तसेच सर्व अधिवक्त्यांचे सहकार्य व विश्वासामुळे हा विजय शक्य झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

---

## खरेदीच्या बहाण्याने नोटरीद्वारे दोन टीप्पर घेतले ताब्यात अन् रक्कम न देताच केले लंपास!

**विदर्भ केसरी । चंद्रपूर**

मार्ग कोणताही असो, बस्स पैसा मिळाला पाहिजे; अशी अनेकांची मनधारणा झालेली आहे. पण, एखाद्या वाम मार्गाला जाऊन निवडलेला मार्ग चिरकाल टिकणारा नसतो. चोर कितीही चोऱ्या करीत असला तरीही एक ना एक दिवस जाळ्यात अडकत असतोच आणि असाच काहीसा प्रकार चंद्रपूर जिल्ह्यात उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, आरोपीने खरेदीच्या बहाण्याने वकीलाकडे नोटरी करून दोन टीप्पर ताब्यात घेतले. टीप्पर ताब्यात तर घेतले खरी, पण मालकास पैसे न देताच दोन्ही टीप्पर लंपास करून गॅस कटरने कापून त्यांचे तुकडे केले. प्रकरणी भद्रावती येथील एका व्यावसायिकाची फसवणूक करणाऱ्या टोळीच्या घुग्घुस पोलिसांनी मुसक्या आवळून आरोपीकडून चेसिसचे तुकडे, टायर, ऑईल टाकी, फायबर बोनेट व इतर साहित्य जप्त केले आहे. प्रकरणात नागपूर येथून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर यातील मुख्य आरोपी सध्या छत्तीसगड पोलिसांच्या ताब्यात आहे.

चंद्रपूर जिल्ह्याच्या भद्रावती येथील व्यवसायिक गोविंद अतुल कुंडू यांनी एमएच २९ बीई १६५६ व एमएच २९ बीई १६५७ क्रमांकाचे टाटा डंपर घुग्घुस येथील साबीर अली सिराजउद्दीन सय्यद यांना नोटरी करून विक्री केले. मात्र, साबीर सय्यदने ठरलेली रक्कम न देता फसवणूक करून दोन्ही ट्रक लंपास केले. या तक्रारीवरून घुग्घुस पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता एपीआय योगेश पाटील यांनी तांत्रिक तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपीने ट्रक नागपूर येथील जिया उर रहमान उर्फ जिया अन्सारी याच्या ताब्यात दिल्याचे समोर आले. घुग्घुस पोलिसांनी नागपूर येथे धाड टाकून जिया अन्सारी याला ताब्यात घेत चौकशी केली असता साबीर अलीच्या सांगण्यावरून दोन्ही ट्रक गॅस कटरने कापून त्यांचे तुकडे करण्यात आल्याची कबुली दिली. त्यानुसार, त्याच्याकडून चेसिसचे तुकडे, टायर, ऑईल टाकी, फायबर बोनेट व इतर साहित्य जप्त केले आहे. दरम्यान, मुख्य आरोपी साबीर अली सय्यद याच्यावर छत्तीसगडमध्येही अशाच प्रकारचे गुन्हे दाखल असून, तो सध्या तेथील पोलिसांच्या ताब्यात आहे.

---

## कमलापूर जंगलात भीषण आग ; शासकीय हत्ती कॅम्पसह वनसंपत्ती जळून खाक..!

**विदर्भ केसरी । अहेरी**



तालुक्यातील कमलापूर येथील राज्यातील एकमेव हत्ती कॅम्पलगतच्या जंगलाला ६ एप्रिल रोजी आग लागली. यामुळे मौल्यवान वनस्पती व वनउपज मोठ्या प्रमाणात जळून खाक झाले. सिरोंचा वनविभागांतर्गत कमलापूर वनपरिक्षेत्रातील दामरंच्या मार्गालगत असलेल्या जंगल परिसरात लागलेल्या आगीने पाहता पाहता रौद्ररुप धारण केले. घटनास्थळी वनविभागाचे अधिकारी तत्काळ धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. विशेष म्हणजे, या परिसरात शासकीय हत्ती कॅम्प असून सुमारे नऊ हत्ती येथे वास्तव्यास आहेत. अशा संवेदनशील ठिकाणी आग लागल्यामुळे स्थानिकांनी सवाल उपस्थित केला आहे, की याची जबाबदारी कोण घेणार? स्थानिकांनी जंगलाला वणवे लागू नये, यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. तसेच, या आगीची चौकशी करून जबाबदारांचा शोध घेण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

---

# गडचिरोली जिल्ह्यासाठी आनंदाची बातमी

## वडसा-आरमोरी ब्रॉडगेज रेल्वे मार्ग एप्रिलअखेर होणार सुरू..!

**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**




गडचिरोली : जिल्ह्याच्या विकासाची 'लाईफलाईन' ठरू पाहणाऱ्या वडसा-गडचिरोली ब्रॉडगेज रेल्वे मार्गाचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरणार आहे. दक्षिण पूर्व मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, या मार्गावरील वडसा ते आरमोरी दरम्यानचा सुरुवातीचा २० किमीचा टप्पा यावर्षी एप्रिल अखेर किंवा मे महिन्याच्या मध्यापर्यंत कार्यान्वित करण्याची तयारी पूर्ण झाली आहे. विकासाचे नवे पर्व दशकांपासून नक्षलवादाच्या सावटाखाली असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात आता विकासाचे वारे वाहू लागले आहेत.

सततच्या सुरक्षा कारवाया आणि नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण यामुळे जिल्ह्यात शांतता प्रस्थापित होत असतानाच, रेल्वेच्या आगमनाने जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीला मोठी गती मिळणार आहे.

प्रवासाच्या वेळेत मोठी बचत रेल्वेच्या या नव्या मार्गामुळे रस्ते प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. वडसा-आरमोरी विभागामुळे प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी होईल, असा विश्वास विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता यांनी व्यक्त केला आहे.

यामुळे प्रवाशांना अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह कनेक्टिव्हिटी उपलब्ध होणार आहे. आर्थिक आणि औद्योगिक क्रांती हा रेल्वे मार्ग केवळ प्रवासासाठीच नाही, तर जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठीही महत्त्वाचा ठरणार आहे. **खनिज वाहतूक :** लोहखनिज, कोळसा आणि पोलाद उत्पादनांची किफायतशीर वाहतूक शक्य होईल. कृषी विकास: वनोपज आणि शेतीमालाच्या वाहतुकीला मदत मिळाल्याने शेतकऱ्यांचा फायदा होईल. रोजगार निर्मिती: बांधकाम आणि संचलन दरम्यान हजारो प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील. **शिक्षण आणि आरोग्य:** आदिवासी समुदायांना मोठ्या शहरांमधील शिक्षण आणि आरोग्य सुविधांपर्यंत पोहोचणे सुलभ होईल. प्रकल्पाची सद्यस्थिती वडसा ते आरमोरी (२० किमी): काम पूर्ण झाले असून सुरक्षा आयोगाच्या मंजुरीनंतर लगेच सुरू होणार. **आरमोरी ते गडचिरोली:** या उर्वरित टप्प्याचे काम प्रगतीपथावर असून पुढील वर्षाच्या सुरुवातीला ते पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. गुंतवणूक: हा प्रकल्प केंद्र आणि राज्य सरकारच्या ५०:५० खर्चाच्या भागीदारीतून साकारला जात आहे. सुमारे २२० हेक्टर जमिनीचे अधिग्रहण पूर्ण झाले असून, वनविभागाच्या काही परवानग्या मिळताच कामाला अधिक गती मिळणार आर आहे. या रेल्वे प्रकल्पामुळे गडचिरोली आता राष्ट्रीय रेल्वे नकाशावर ठळकपणे झळकणार आहे.

---

### जुगार खेळवणारा पोलिसांच्या छाप्यात पकडला!



देसाईगंज :- तालुक्यातील कोरेगाव परिसरात पोलिसांनी सट्टापट्टी जुगारावर छापा टाकून आरोपीला ताब्यात घेतले. ही कारवाई ४ एप्रिल रोजी करण्यात आली. पोलीसांनी दिगंबर देवीदास गुड्डीमेश्राम या आरोपीला पानटपरीच्या बाजूला सट्टापट्टी जुगार खेळवताना पकडले. त्याच्याकडून रोख रक्कम आणि जुगार साहित्य असा एकूण ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. उपनिरीक्षक कोमल माने यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

---

## अडीवागू पुलाचे काम रखडले; तात्काळ पूर्णत्वाची मागणी

### अन्यथा आंदोलनाचा इशारा

**विदर्भ केसरी । सिरोंचा**




सिरोंचा-आलापल्ली राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३ ला जोडणाऱ्या टेकडा–कंबलपेठा मार्गावरील अडीवागू नाल्यावर सुरू असलेले पुलाचे बांधकाम अत्यंत संथ गतीने सुरू असून अद्याप अपूर्ण आहे. त्यामुळे परिसरातील सुमारे ३० ते ४० गावांचा संपर्क धोक्यात आला असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळा तोंडावर आला असतांनाही पुलाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप होत आहे. पर्यायी रस्त्याची योग्य व्यवस्था नसल्याने नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. अलीकडेच येथे अपघाताची घटना घडली असून मोठी जीवितहानी टळली असली तरी प्रशासनाने अद्याप गांभीर्याने दखल घेतलेली नाही, अशी टीका होत आहे.

या पार्श्वभूमीवर भाकपचे सिरोंचा तालुका सचिव रवि बारसागंडी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन तात्काळ हस्तक्षेपाची मागणी केली आहे. पुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, पावसाळ्यापूर्वी सुरक्षित पर्यायी रस्त्याची व्यवस्था करावी तसेच कामातील विलंबाबाबत सखोल चौकशी करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. आता प्रशासन या गंभीर प्रश्नावर कोणती भूमिका घेते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

गडचिरोली TODAY GOOD MORNING

BREAKING NEWS



दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू

बुधवार, दि. 8 एप्रिल 2026



» Selected

## गडचिरोलीत धानोरा मार्गावर दुचाकीला मागून कारची धडक ; जावई-सासू जखमी..!

गडचिरोली :- मेंढा गावाकडे जातांना धानोरा मार्गावरील एका जीमसमोर दुचाकीवर मागून येणाऱ्या कारने जोरदार धडक दिली, ज्यात जावई आणि सासू जखमी झाले. ही घटना ५ एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच वाजता घडली. जखमी जावईचे नाव रूपेश दिवाकर भुरले (३०, रा. मेंढा, ता. गडचिरोली) आणि सासूचे नाव शशिकला निंबाजी चलाख (५०, रा. कापशी, ता. सावली, जि. चंद्रपूर) आहे. ते दोघे कौटुंबिक कामानिमित्त गडचिरोलीहून मेंढा येथे दुचाकीवरून (एमएच ३३ एजे-२७९६) जात होते. धानोरा मार्गावर जीमसमोर मागून येणाऱ्या कारने (सीजी ०८ एएफ ५७७८) त्यांना जोरदार धडक दिली. धडक दिल्यानंतर कार चालक न थांबता घटनास्थळ सोडून निघून गेला. जखमी जावई - सासूवर खासगी दवाखान्यात उपचार सुरू आहेत. पोलीस घटनास्थळी दाखल होऊन कारचा शोध सुरू केला आहे आणि पुढील तपास सुरू आहे.

---

## देसाईगंजची नमिरा बुरबुरे ऑलिम्पियाडमध्ये राज्यात अव्वल!



देसाईगंज (गडचिरोली) :- नुकताच इंटरनॅशनल सायन्स ऑलिम्पियाड २०२५-२६ च्या अंतिम परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या परीक्षेत देसाईगंज येथील जेजानी स्कूल ऑफ स्कॉलर या शाळेतील इयत्ता तिसरीत शिकणारी नमिरा रमेश बुरबुरे हिने सायन्स विषयात राज्यात चौथा क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशाबद्दल तिला १ हजार रुपयांची शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. येत्या जून महिन्यात प्रमाणपत्र व शिष्यवृत्तीचे वितरण होणार आहे. नमिराच्या या यशाबद्दल शाळेचे संस्थापक, मुख्याध्यापिका तसेच वर्गशिक्षिका यांनी नमिराचे अभिनंदन केले आहे. तिच्या या कामगिरीमुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून पालकवर्गातून नमिरावर कौतुकांचा वर्षाव केला जात आहे.

---

## अजयभाऊ कंकडालवारकडून भाविकांना अन्नदान वितरण..!



देसाईगंज : दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा सिरोंचा तालुक्यातील चिंतारेऊला येथे आज श्री. महाकाली मातेची यात्रा मोठ्या उत्साहात व हजारो भाविकांच्या साक्षीने पार पडली. या यात्रेत तेलंगणा, छत्तीसगड व महाराष्ट्रातील भक्त मोठ्या संख्येने येऊन महाकाली मातेजवळ नतमस्तक होऊन दर्शन घेत असतात. महाकाली मातेची या यात्रेला तालुक्यात अनन्य महत्व आहे. या यात्रेत येणाऱ्या भाविक व भक्तासाठी गडचिरोली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव डॉ.अजयभाऊ कंकडालवार यांनी अन्नदान कार्यक्रम आयोजित केले होते. या अन्नदानाचा आस्वाद हजारो भाविक भक्तांनी घेतला. मंदिर कमिटीकडून सतत तीन दिवस अनेक विविध कार्यक्रम भक्तिमय वातावरण पार पडला.

# ई-पंचनामा ते कर्जसवलतीपर्यंत मोठे निर्णय!

## सामान्य नागरिक, शेतकरी आणि उद्योगांना दिलासा

विदर्भ केसरी । मुंबई



**ई-पंचनामा आणि डिजिटल सुविधा अधिक सक्षम**


ई-पंचनामा प्रणाली अधिक प्रभावी करण्यासाठी तांत्रिक सुधारणांनाही मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे शेतीतील नुकसानाचे तात्काळ आणि अचूक मूल्यांकन करता येणार आहे. शेतकऱ्यांना मदत मिळण्याची प्रक्रिया जलद होणार असून, पारदर्शकतेतही वाढ होईल.

राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देत सामान्य नागरिकांच्या अडचणी कमी करण्याच्या दृष्टीने राज्य मंत्रिमंडळाने आज (७ एप्रिल) झालेल्या बैठकीत पाच महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत माहिती तंत्रज्ञान, ऊर्जा, नियोजन आणि आपत्ती व्यवस्थापन या प्रमुख विभागांशी संबंधित धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. या निर्णयांमुळे प्रशासन अधिक गतिमान होणार असून, नागरिकांना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक सुलभ सेवा मिळणार आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी झेप राज्यात स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग स्थापन करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या ध्येयाच्या दिशेने हे पाऊल निर्णायक मानले जात आहे. सध्याचे माहिती तंत्रज्ञान संचालनालय आता आयुक्तालयात रूपांतरित होणार असून, मंत्रालयीन स्तरापासून जिल्हास्तरापर्यंत नवीन आयटी संवर्ग (IT Cadre) तयार केला जाणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील डिजिटल गव्हर्नन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासनाला मोठी चालना मिळणार आहे. शासकीय कामकाज अधिक पारदर्शक, जलद आणि परिणामकारक करण्याचा उद्देश यामागे आहे. नियोजन विभागांतर्गत महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (MRSAC) चे रूपांतर कंपनीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोसायटी कायद्याऐवजी कंपनी कायद्यानुसार याची पुनर्रचना होणार असून, यामुळे विविध विकास प्रकल्पांना गती मिळेल. रस्ते माहिती प्रणाली, नगररचना, जलयुक्त शिवार, पाणलोट विकास, भूजल व्यवस्थापन, खनिज अभ्यास यांसारख्या प्रकल्पांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होणार आहे. याचबरोबर 'महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर' (महाजिओटेक) या नव्या कंपनीची स्थापना करण्यात येणार आहे. भू-स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासन अधिक अचूक आणि जलद निर्णय घेऊ शकेल. विद्यार्थ्यांसाठी, संशोधकांसाठी आणि उद्योजकांसाठी नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. ऊर्जा विभागाने महावितरण कंपनीच्या आर्थिक पुनर्रचनेचा मोठा निर्णय घेतला आहे. सुमारे ३२,६७९ कोटी रुपयांच्या शासन हमी असलेल्या कर्जासाठी भांडवली बाजारातून निधी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय कृषी वीज वितरण व्यवसायाचे विभाजन (Agri Demerger) करण्यात येणार असून, महावितरण कंपनीला शेअर बाजारात सूचीबद्ध करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. या निर्णयामुळे कंपनीची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल आणि वीज वितरण अधिक कार्यक्षम होण्याची अपेक्षा आहे.आपत्ती व्यवस्थापन विभागांतर्गत 'महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम' (MRDP) राबविण्यास मंजुरी देण्यात आली आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने १६५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. या योजनेतून आपत्तीग्रस्त नागरिकांना गृहकर्जात सवलत, तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSME) कर्जसहाय्य व विमा संरक्षण दिले जाणार आहे. पूरग्रस्त भागांमध्ये विशेष उपाययोजना करण्यात येणार असून, कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी आणि कृष्णा खोऱ्यातील पूरस्थिती नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक आराखडे तयार केले जाणार आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या या निर्णयांमुळे प्रशासन अधिक आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित होणार आहे. शेतकरी, उद्योग, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी हे निर्णय दिलासादायक ठरणार आहेत. विशेषतः आपत्तीग्रस्तांना आर्थिक मदत, कर्जसवलती आणि विमा संरक्षण मिळणार असल्याने सामाजिक सुरक्षिततेची भावना अधिक बळकट होईल. एकूणच, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेले निर्णय हे राज्याच्या दीर्घकालीन विकासासाठी महत्त्वाचे मानले जात आहेत. डिजिटलायझेशन, आर्थिक सुधारणा आणि आपत्ती व्यवस्थापनातील सुधारणा यामुळे महाराष्ट्र अधिक सक्षम, सुरक्षित आणि प्रगत दिशेने वाटचाल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

## आता प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा थेट ग्रामस्थांच्या दारापर्यंत

विदर्भ केसरी । मुंबई



**मुंबई** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राज्य शासनाच्या 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मंगळवारी जागतिक आरोग्य दिनानिमित्त शुभारंभ करण्यात आला. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना आहे. ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि लोकाभिमुख करण्यासाठी सरकारने हे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश प्रत्येक गाव आरोग्यदृष्ट्या स्वयंपूर्ण करणे हा आहे. मोहिमेअंतर्गत गावागावांत आरोग्य शिबिरे आयोजित करून नागरिकांची आरोग्य तपासणी, आजारांचे वेळेवर निदान आणि उपचार यांवर भर दिला जाणार आहे. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा थेट ग्रामस्थांच्या दारापर्यंत पोहोचवणे, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. लोकसहभागातून हे अभियान यशस्वी करण्याचे आवाहन यावेळी मुख्यमंत्र्यांनी केले. शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचल्यास ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत हे अभियान संपूर्ण राज्यात प्रभावीपणे राबवले जाणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह अन्य मंत्रिमंडळ सदस्य उपस्थित होते.

# "माज करू नका, नाहीतर देव उचलून नेईल!" : नितीन गडकरी

विदर्भ केसरी । नागपूर

भारतीय जनता पक्षाच्या ४६व्या स्थापना दिनानिमित्त नागपूरात झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कार्यकर्त्यांना स्पष्ट आणि कडक शब्दांत कान टोचले. सत्ता, पद आणि खुर्ची मिळाल्यानंतर अहंकार वाढू देऊ नका, अन्यथा त्याचे परिणाम भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला. "जो खुर्चीवर बसला आहे तो एक दिवस उठणारच आहे.

आणि जर नाही उठला, तर देव त्याला घेऊन जाईल," अशा थेट शब्दांत गडकरी यांनी सत्तेतील माजावर प्रहार केला. त्यांच्या या विधानाने कार्यक्रमात एकच खळबळ उडाली. गडकरी यांनी आपल्या भाषणात पक्षाच्या वाढीत कार्यकर्त्यांचे महत्त्व अधोरेखित केले. नेतृत्व हे वरून लादलेले नसून कार्यकर्त्यांतूनच घडायला हवे, असे ते म्हणाले. "नेतृत्वाच्या पोटातून नेतृत्व जन्माला येऊ नये, ते कार्यकर्त्यांतून घडले पाहिजे," असे सांगत त्यांनी पक्षातील लोकशाही प्रक्रियेवर भर दिला.

"संधी नाही, समाज बदलायला आलोय" कार्यकर्त्यांच्या मानसिकतेवर भाष्य करताना गडकरी म्हणाले, "काही जणांना दिवसरात्र फक्त निवडणुका आणि स्वतःची संधी दिसते. 'मला एक संधी द्या' हा त्यांचा टाहो असतो. पण आम्ही संधी द्यायला नाही आलो, समाज बदलायला आलो आहोत."

त्यांच्या या विधानातून संधीसाधू राजकारणावर त्यांनी जोरदार निशाणा साधला. सत्ता मिळाल्यानंतर कार्यकर्त्यांनी नम्रता गमावू नये, असे सांगताना गडकरी म्हणाले की, पक्षाची ताकद ही सामान्य कार्यकर्त्यांच्या कष्टांमुळे वाढली आहे. "कार्यकर्ता हा पक्षाचा कणा आहे. त्यामुळे पद मिळाल्यावर माज दाखवू नका," असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला.

# आय.टी.आय. निदेशक संघटनेचा अमरावती विभागीय मेळावा व कृतज्ञता सोहळा

विदर्भ केसरी । प्रल्हाद मेश्राम



देसाईगंज - आय.टी.आय. निदेशक संघटनेचा अमरावती विभागीय मेळावा व कृतज्ञता सोहळा "श्री क्षेत्र श्रद्धासागर" येथे उत्साहात नुकताच पार पडला. महाराष्ट्र राज्य आय.टी.आय. निदेशक संघटना, अमरावती विभागाच्या वतीने श्री क्षेत्र श्रद्धासागर, अकोट या पवित्र स्थळी विभागीय मेळावा आणि मार्गदर्शक मा. श्री. भोजराज काळे (जवर्डीकर) यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा अत्यंत दिमाखात पार पडला.

या सोहळ्याला विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ सरकार्यवाह तथा नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार श्री. सुधाकर अडबाले, आमदार श्री. संजयराव खोडके, अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाचे विमाशि संघाचे अधिकृत उमेदवार श्री. दिलीप कडू, श्री. रमेशजी हिंगणकर (संचालक, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फे. लि. मुंबई), श्री. अनंत सोमकुवर (सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, अमरावती), श्री. गजाननराव चोपडे (माजी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी), ॲड. श्री. गजाननराव पुंडकर (उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती), श्री. शरदचंद्र टेकरे (प्राचार्य, अकोला), श्री. विनोद पाटील, श्री. संतोष साळुंके, श्री. विवेक पडोळे (प्राचार्य, आय.टी.आय. अकोला) आणि श्री. राजेश खडबडे (सरचिटणीस, आयटीआय निदेशक संघटना), विमाशी संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष श्री. जयदीप सोनखासकर यांच्यासह विभागातील शेकडो पदाधिकारी व निदेशक उपस्थित होते. अकोटच्या पावन भूमीत पार पडलेल्या या मेळाव्यात संघटनेचे माजी सरचिटणीस श्री. भोजराज काळे सरांचा त्यांच्या प्रदीर्घ आणि प्रेरणादायी सेवेबद्दल मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी आयटीआय निदेशकांच्या प्रलंबित प्रश्नांवर खंबीर पाठिंबा दर्शवित मागण्या शासनादरबारी लावून धरण्याचे आश्वासन दिले.

# भागवत सप्ताह शोभायात्रेत माजी खा. डॉ. अशोकजी नेते व आमदार बंटीभाऊ भांगडिया यांची उत्स्फूर्त उपस्थिती

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे



चिमुर :- तालुक्यातील मौजा शंकरपूर येथे श्रीमद् भागवत सप्ताहानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेला माजी खासदार तथा भाजपा अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते आणि चिमुरचे लोकप्रिय आमदार बंटीभाऊ उर्फ कीर्ती कुमार भांगडिया यांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवली. या धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. हनुमंतरायाच्या कृपेने, संत मंडळींच्या आशीर्वादाने आणि शंकरपूर ग्रामस्थांच्या सहकार्याने मागील तब्बल ४६ वर्षांपासून श्रीमद् भागवत कथा महायज्ञ अखंडपणे सुरू आहे. यंदा हा सप्ताह ३० मार्च ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत वृंदावन धाम हनुमान मंदिर देवस्थान, शंकरपूर येथे कथा प्रवक्ते ह.भ.प. श्री. ज्ञानेश्वर महाराज गावंडे यांच्या ओजस्वी वाणीतून संपन्न होत आहे.

विशेष म्हणजे, याच दिवशी भारतीय जनता पक्षाचा ४६वा स्थापना दिन असल्याने या सोहळ्याला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले. शोभायात्रेदरम्यान पारंपरिक दिंडी, फटाक्यांची आतिषबाजी आणि भक्तिरसात न्हालेल्या वातावरणात गावभर जल्लोष पाहायला मिळाला. यावेळी मार्गात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. अशोकजी नेते यांनी "भागवत सप्ताहात सहभागी होणे हे माझे भाग्य असून अशा धार्मिक परंपरा समाजाला संस्कार व एकात्मतेचा संदेश देतात," असे मत व्यक्त केले. दरम्यान, नुकतेच काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केलेले दिग्गज नेते तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सतीश वारजुकर यांच्या शंकरपूर येथील निवासस्थानी डॉ. नेते यांनी सदिच्छा भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले. या भेटीत सौहार्दपूर्ण वातावरणात विविध विषयांवर चर्चा झाली. या कार्यक्रमाला आमदार बंटीभाऊ भांगडिया, माजी जि.प. अध्यक्ष सतीश वारजुकर, युवा मोर्चाचे प्रदेश चिटणीस तथा भिसी नगरपंचायत प्रमुख मनीष तुमपल्लीवार, तालुकाध्यक्ष राजू पाटील झाडे, भाजयुमो तालुकाध्यक्ष बालू भाऊ पिसे, तसेच प्रकाश असावा, कैलास धारणे, गोलू भरडकर यांच्यासह मोठ्या संख्येने भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# भीती अन् लैंगिक शोषण... खरातचा भयानक चेहरा उघड

## SITच्या खुलाशाने खळबळ ; श्रद्धेचा गैरफायदा घेऊन महिलांना जाळ्यात अडकवले

विदर्भ केसरी । मुंबई



भोंदू अशोक खरात प्रकरणात विशेष तपास पथकाने (SIT) केलेल्या तपासातून धक्कादायक बाबी समोर आल्या असून, आरोपीचा सर्वात भयानक चेहरा उघड झाला आहे. SIT प्रमुख आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांनी पत्रकार परिषद घेऊन तपासातील महत्त्वाचे खुलासे केले. सातपुते यांनी सांगितले की, या प्रकरणाचा तपास २० मार्चपासून SITकडे सोपविण्यात आला असून सध्या एकूण ११ गुन्ह्यांचा तपास पथकाकडून सुरू आहे. या तपासासाठी दोन पोलीस उपअधीक्षकांसह एकूण २४ अधिकाऱ्यांचे विशेष पथक कार्यरत आहे. नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांमध्ये अशोक खरातविरोधात एकूण १२ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यापैकी ९ गुन्ह्यांचा तपास SIT करत असून उर्वरित गुन्ह्यांचा तपास स्थानिक पोलिसांकडे सुरू आहे. तसेच काही संबंधित गुन्ह्यांचाही तपास SITकडे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी खरात हा पीडितांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत त्यांना जाळ्यात अडकवत होता. "तो महिलांना दैवी शक्ती असल्याचा भास देत असे. खडे, चिंचोके, पूजा-विधी यांच्या नावाखाली पैसे उकळत होता," अशी माहिती सातपुते यांनी दिली. त्याचबरोबर आरोपी महिलांना त्यांच्या कुटुंबीयांच्या मृत्यूची भीती दाखवत असे. बदनामीची धमकी देऊन त्यांच्यावर मानसिक दबाव निर्माण करत आणि त्यातूनच लैंगिक शोषण करत असल्याचेही तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणातील गुन्ह्यांपैकी ८ गुन्हे महिला लैंगिक अत्याचाराशी संबंधित असून उर्वरित प्रकरणांमध्ये फसवणूक, सावकारी आणि अंधश्रद्धा विरोधी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल आहेत. आतापर्यंत ३० हून अधिक साक्षीदारांची चौकशी करण्यात आली आहे. याशिवाय, ईशानेश्वर मंदिर परिसरात अंधाराचा फायदा घेत हातचलाखीने स्वतःकडे दैवी शक्ती असल्याचे भासवून समाजात अंधश्रद्धा पसरवण्याचे काम आरोपी करत होता, असेही तपासातून निष्पन्न झाले आहे. एकूणच, या प्रकरणातील तपासातून समोर आलेल्या माहितीमुळे समाजात मोठी खळबळ उडाली असून, पुढील काळात आणखी गंभीर बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण, महाअभियान व स्थापना दिवस

विदर्भ केसरी । देसाईगंज



भारतीय जनता पार्टी तालुका कोरची च्या वतीने पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान घेण्यात आले. राज्यात शेकडोच्या संख्येने प्रशिक्षण वर्ग होत आहेत. नवीन कार्यकर्त्यांना भाजपाचा इतिहास समजावा, भारतीय जनसंघ, जनता पक्ष, भारतीय जनता पक्ष 1951 ते 2026 पर्यंतचा इतिहास कार्यकर्त्यांना माहित व्हावं हा त्या मागचा उद्देश आहे. प्रशिक्षण वर्ग दोन दिवस करण्यात आला. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय कृष्णाजी गजबे माजी आमदार यांनी केले. आपल्या सरकारची कामगिरी या विषयावर वर्गाला मार्गदर्शन केले, वैचारिक अधिष्ठान या विषयावर माननीय रमेशजी बारसागडे जिल्हाध्यक्ष, यांनी विचार व्यक्त केले, तसेच मा.किसनजी नागदेवे माजी जिल्हा अध्यक्ष यांनी संघटन विस्ताराची दृष्टी, सदानंद कुथे जिल्हा महामंत्री यांनी आपली कार्य पद्धती. मा.देवरावजी गजभिये जिल्हा आघाडी अध्यक्ष यांनी पक्षाचा इतिहास , मा. चांगदेव जी फाये तालुका अध्यक्ष बूथ व्यवस्थापन, वरील सर्व विषयावर मान्यवर्गांनी प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वर्गाला तालुक्यातील कार्यकर्ते व पदाधिकारी व महिला कार्यकर्ते उपस्थित होते. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी, सदाराम नुरुटी तालुका अध्यक्ष, आनंदभाऊ चौबे महामंत्री नसरु भाऊ भामानी माजी तालुका अध्यक्ष , डॉक्ट. बिसेन साहेब,महिला आघाडी अध्यक्ष यांनी सहकार्य केले.